आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

# शेतकरी संघटक

२१ नोव्हेंबर २०११ । वर्ष २८ । अंक १६

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹१०



## कापूस पेटणार?

विभागीय अमरावती कापूस परिषद दि. १ नोव्हेंबर २०११

विभागीय नांदेड कापूस परिषद दि. ५ नोव्हेंबर २०११

विभागीय हिंगणघाट, वर्धा कापूस व धान उत्पादक परिषद दि. ७ नोव्हेंबर २०११

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक १६ । २१ नोव्हेंबर २०११

**मूल्य : ₹ १०**

संपादक

**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक

**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक

**डॉ. मानवेंद्र काचोळे**

**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक

**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठ/अंक मांडणी

**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**



**संपर्क** : कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४–समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१, फोन : ०२४०–२३४१००४. ईमेल : shetkarisanghatak@gmail.com



● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


# अंतरंग


जागरण
**शिक्षणाची शाळा**
श्रीकृष्ण उमरीकर ........ ३

आजकाल
**आता कापूसही पेटणार?**
ज्ञानेश्वर शेलार ........ ६

स्वातंत्र्य
**हे काय चालले आहे?**
विनय हर्डीकर ........ ८

चर्चा
**मुख्यमंत्र्यांचा अव्यापारेषु व्यापार**
गिरधर पाटील ........ ११

मुलाखत
**सौ. जयश्री पाटील**
मुलाखतकार– ज्ञानेश्वर शेलार ........ १३

कॉमन नॉन सेन्स
**शेतकरी आंदोलनाची पुनर्मांडणी**
सुधाकर जाधव ........ १६

वाङ्मय शेती
**गरिबी निर्मुलनाची क्षमता केवळ शेतीव्यवसायातच**
गंगाधर मुटे ........ १९

मिरचीचे खळे
**सारे मिळूनी करू भकास**
बाबू सोंगाड्या ........ २२

अभिजात वाङ्मय
**गोदान**
मूळ लेखक : मुन्शी प्रेमचंद, अनु. अनंत उमरीकर ........ २४

**शेतकरी संघटना वृत्त** ........ २७

# शेतकऱ्याच्या पोराला सत्तेचा जोर बापाच्या गळा आत्महत्येचा दोर

कापसाच्या पट्ट्यात सुरू झालेल्या आत्महत्येच्या घटनांनी पोटात गोळा उठला आहे. कापसाचे भाव उतरले असून त्यावर कुठला उपाय करावा ते सामान्य शेतकऱ्याला कळेनासे झाले आहे. उसापाठोपाठ कापूस पट्ट्यातही शेतकरी आंदोलनासाठी रस्त्यावर उतरण्याची भाषा करू लागला आहे. ठिकठिकाणी कापूस परिषदा आणि रास्ता रोकोही झाले आहे. कापसाचा लढा तीव्र होण्याची दाट शक्यता आहे; पण यासोबतच आत्महत्यांच्या बातम्यांनी मोठी खळबळ माजवली आहे. कुठलीही उपाययोजना ही तात्पुरती ठरते हे सिद्ध झालं आहे. कायमस्वरूपी कापूस, ऊस, कांदा इतकंच नव्हे साऱ्या शेतमालासंदर्भात ठोस आणि सकारात्मक धोरणं आखण्याची गरज आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आजही सरकार याबाबत गंभीर नाही. सत्ताधारी लोकप्रतिनिधींचा कोडगेपणा असा, सर्वसामान्यांचा रोष प्रत्यक्षात झेलावा लागू नये म्हणून तेही शेतमालाला भाव देण्याची भाषा करत आहेत. सामान्य शेतकऱ्याला मग स्वाभाविकच असा प्रश्न पडतो- ''बाबा रे, मिळू दे की आमच्या पिकाला भाव! मग रोखलंय कुणी? ही जी तुझी बडबड चालू आहे ती निर्णय घेणाऱ्या तुझ्या नेत्यासमोर कर की!''

सत्ताधारी पक्ष असो की, विरोधक असो- सामान्य जनता आपल्याला सोडणार नाही, या धसकीने आंदोलक शेतकऱ्याची भाषा आधीच करू लागले आहेत. शिवसेनेने उसाला तेहतीसशे रुपये भाव मागितला. खरं तर, शिवसेना आणि त्यांचे सगळे नेते यांना आजही साखरेचं किमान अर्थशास्त्रही कळत नाही. शेतकरी संघटनेने याबाबत अतिशय समतोल आणि शास्त्रशुद्ध भाषा करत २१०० रुपये भाव मागितला होता. इतकंच नाही. राजू शेट्टी यांच्या आंदोलनाचं मुक्त कंठाने कौतुक करत शरद जोशी यांनी २३५० रुपयांचा राजू शेट्टींचा चुकलेला हिशेबही माध्यमांमधून जाहीर सांगितला होता. शेतकरी आंदोलनाने कुठलीही अवास्तव मागणी यासंदर्भात केली नाही. कारण, शेतकरी संघटनेचं तत्त्वज्ञान हे फक्त शेतकऱ्यांच्या हितापुरतं नसून सर्वच जनतेच्या हितासाठी आहे. आजही कापसाचा जो तिढा निर्माण झालेला आहे. तो सोडवण्यासाठी निर्यातबंदी कायमस्वरूपी उठवण्याची मूलभूत मागणी संघटना करत आहे. इतर गट फक्त भावाची गोष्ट करतात. इतकंच नाही, वर्तमान पत्रात काही विद्वान शेतकऱ्यांना पेंशन द्या, असल्या बाष्कळ मागण्या करत राहतात. शिवसेनेसारख्या उठवळांनी केलेल्या ३३०० रुपये भावाच्या अनुषंगाने फुकटच कारण नसताना शेतकरी संघटना आणि एकूणच शेती आंदोलनाला झोडपून काढतात. या सगळ्यांनी शेतकरी संघटनेने अगदी आधीपासून याबाबत केलेली मागणी समजून घेतली, तर असले घोळ ते करणार नाहीत.



सत्ताधाऱ्यांना सत्तेचा विलक्षण माज चढलेला आहे. फक्त तोंडदेखले 'कापसाला ६००० रुपये भाव भेटला पाहिजे' अशी तेही मागणी करू लागले आहेत. प्रसिद्ध उद्योगपती विजय मल्ल्या यांची किंगफिशर कंपनी बुडू लागली तर तिला सावरलं पाहिजे असलं निर्लज्ज विधान सत्ताधारी करतात. तेव्हा काय करावं तेच कळत नाही! आयपीएलच्या क्रिकेट सामन्यांमध्ये उघड्यानागड्या पोरी नाचवणाऱ्या विजय मल्ल्यांची शासनाला किती ही काळजी! आणि तेच अर्धपोटी उघड्यानागड्या शेतकऱ्याकडे पाहायलाही वेळ नाही. आपल्या आत्महत्येनं आपलं एकूणच आंदोलन लाल रंगात लिहून ठेवणाऱ्या गरीब बिचाऱ्या कुणब्याची अक्षरे सत्ताधाऱ्यांच्या डोळ्यांना दिसत नाहीत. त्यांना दिसतो तो विजय मल्ल्यांचा चकचकाट आणि तो मंद होऊ लागला की, यांच्या पोटात कालवाकालव सुरू होते. हातावर पोट असणारा सर्वसामान्य शेतकरी निर्यातबंदी उठवा म्हणून तळमळीने सांगतो आहे. देशाला परकीय चलन मिळावं म्हणून धडपडतो आहे. जागतिक व्यापारात आपला हिस्सा वाढावा म्हणून खस्ता खातो आहे. आपल्याला मिळणाऱ्या चार पैशांसोबत देशाचंही कल्याण झालं पाहिजे ही व्यापक भूमिका ठेवतो आहे आणि तिकडे स्वतःचे शोक पुरवण्यासाठी हिडीस चाळे करणाऱ्या विजय मल्ल्याच्या बुडणाऱ्या कंपन्यांना मदत देण्याची भाषा चालू आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येने गेलं दशक गाजलं आहे. आपल्या आत्महत्येने या शासनाचं डोकं वठणीवर येत नाही, असा संदेश जर शेतकऱ्यांच्या पुढच्या पिढीपर्यंत पोहोचला तर ही पिढी आक्रमक होऊन हत्या करणार नाही, याची काय खात्री? सत्ताधाऱ्यांनी आपलीच खुर्ची टिकवण्यासाठी केलेल्या खेळामुळे शेतकरी बापाच्या गळ्याभोवती आत्महत्येचा दोर आवळला जातो आहे. आता नुसती भाषा करून भागणार नाही. प्रत्यक्ष कृती करावी लागणार आहे. सगळ्या सगळ्या पॅकेजेसचा, सहकारी बँकांचा, सर्व सरकारी योजनांचा ग्रामीण भागात पूरता बोजवारा उडालेला स्पष्ट दिसतो आहे. या गाळप हंगामानंतर जवळपास अर्धेअधिक कारखाने भंगारमध्ये काढायची वेळ येणार आहे. कापूस खरेदी योजनेचा तर केव्हाच बट्ट्याबोळ झाला आहे. तेव्हा आता प्राप्त परिस्थितीवर उपाय म्हणून सगळ्या फालतू कल्याणकारी योजना शासनाने बंद करून स्पष्ट व स्वच्छपणे काटकसरीने प्रशासनाची व्यवस्था लावायला पाहिजे. गरिबांच्या नावाखाली स्वतःचा पोट भरण्याचा धंदा थांबल्याशिवाय सामान्य शेतकऱ्याला आणि सर्वच जनतेला दिलासा मिळणार नाही.

आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाचे भाव पडलेले आहेत. या परिस्थितीत निर्यात खुली करून जास्त भाव भेटेल ही शक्यता नाही; पण दूरगामी विचार करता निर्यातबंदी कायमस्वरूपी हटवण्याची हीच वेळ आहे. साखर उद्योगात सहकार पुरता अडकला आहे. तोही उद्योग नियंत्रणमुक्त करायची हीच वेळ आहे. तेव्हा सत्ताधाऱ्यांनी सत्तेचा जोर दाखविण्याच्या ईर्षेपोटी शेतकरी बापाच्या गळ्याभोवतीचा आत्महत्येचा दोर आवळत नेऊ नये इतकीच अपेक्षा!

# शिक्षणाची शाळा

**आज शिक्षण क्षेत्रावर सरकारची पोलादी पकड आहे. नवी शाळा उघडण्याचे काम मोठे कठीण आहे. शिक्षण खात्याला योग्य ते खाऊ घातल्या शिवाय नवी शाळा चालू करता येत नाही. पुन्हा सरकारकडून येणारे अनुदान मिळवण्यासाठी पुन्हा देणे-घेणे करावेच लागते. याचा परिणाम असा होतो की शाळा सुरू करणे, ती चालवणे यासाठी शिक्षण क्षेत्रातले तज्ज्ञ-जाणकार हे रस घेत नाहीत तर ज्यांच्याकडे देण्या-घेण्यासाठी लागणारा 'जास्तीचा' पैसा आहे अशीच माणसे जास्त करून शाळा चालवतात. हे थांबलेच पाहिजे. त्यासाठी सरकारने शाळेची परवानगी देण्याचे नियम बदलले पाहिजेत.**

एखाद्या कामाची शाळा करणे म्हणजे त्या कामाचा पचका करून टाकणे किंवा त्याचा खेळखंडोबा करणे. हा शब्द तसा नव्या पिढीत रूढ आहे. आधीच्या पिढीतल्या म्हणजे ४०-५० पेक्षा जास्त वय असलेल्यांना नवा आहे म्हणून मुद्दाम उल्लेख केला.

आपल्या देशात सरकारने शिक्षणाची खरेच शाळा केली आहे. त्याचा खेळखंडोबा केला आहे. महसूल खात्याने नुकत्याच केलेल्या पटपडताळणीवरून हेच दिसून येते.

नांदेड जिल्ह्यातील शाळांची अचानक तपासणी केली असता २०% विद्यार्थी अनुपस्थित असल्याचे आढळून आले. ते सगळे बोगस असावेत असे कोणास वाटले तर ते बरोबरच आहे आणि त्यामुळेच शासनाने राज्यातल्या सगळ्याच शाळांची पटपडताळणी करण्याचा निर्णय घेतला. नांदेडचा अनुभव लक्षात घेऊन शासनाने पुरेपूर काळजी घेतली होती. सर्व राज्यात एकाच वेळी महसूल खात्याच्या कर्मचाऱ्यांकडून ही पटपडताळणी झाली. एका शाळेचे विद्यार्थी दुसऱ्या शाळेत दाखवल्या जाऊ नयेत म्हणून त्यांच्या बोटाला शाई लावण्यात आली. तसेच शाळेत जाणाऱ्या कोणाही पथकाला आपण कोठे जात आहोत हे निघण्यापूर्वीच कळायचे. त्यामुळे 'सेटींग' करण्याची संधी कमी झाली; पण संस्थाचालक जास्त हुशार निघाले. जसे सैनिकांपेक्षा अतिरेक्यांकडे जास्त आधुनिक हत्यारे असतात, आपल्या पोट सुटलेल्या पोलिसांपेक्षा 'सायबर क्रिमनल' जास्त चपळ आणि हुशार असतात. त्याच प्रकारे पटपडताळणी होणार हे कळताच संस्थाचालकांनी आपल्या शाळांचे पटच बदलून टाकले. गेल्या वर्षी दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची संख्या २,१५,००,००० पेक्षा जास्त होती; पण चालू वर्षात पटपडताळणी होणार हे लक्षात घेऊन 'चालू' संस्थाचालकांनी पटच बदलून टाकले! हा केवळ अंदाज किंवा संशय नसून तसेच झाले असावे हे खात्रीपूर्वक सांगता येते ते कसे याचा तपशील खाली दिला आहे.

गेल्या वर्षी दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची संख्या २,१५,००,००० पेक्षा जास्त होती. म्हणजे प्रत्येक वर्गात सरासरी २० लाख पेक्षा जास्त विद्यार्थी असावेत असा अंदाज करता येतो. गेल्या वर्षी दहावीच्या परीक्षेला ३.५ लाख विद्यार्थी बसले होते. म्हणजेच पहिलीत जरी जास्त विद्यार्थी प्रवेश घेत असले तरी ते दहावीत पोहोचेपर्यंत त्यांच्या संख्येत गळती होते. सरकारी आकडेवारी असे सांगते की, सातव्या वर्गात जाईपर्यंत १३% मुले शाळा सोडून गेलेली आसतात. दहावीपर्यंत शाळा सोडणाऱ्या मुलांचा विचार करता दहावीपेक्षा पहिल्या वर्गात किमान २०% मुले जास्त असतील असे अनुमान काढण्यास हरकत नाही आणि म्हणून आपल्याला असे गृहीत धरता येईल की, पहिल्या वर्गात २० लाखाच्या सरासरीपेक्षा किमान २०% जास्त म्हणजे ४-५ लाख मुले जास्त असावीत. म्हणजे पहिल्या वर्गात दरवर्षी २४-२५ लाख विद्यार्थी प्रवेश घेत असावेत. त्यातून गेल्या वर्षी दहावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३.५ लाख वजा केली तर हे स्पष्ट आहे की दरवर्षी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २०-२१ लाखांनी वाढत असावी. म्हणजेच चालूवर्षी दहावीपर्यंत एकूण २ कोटी १५ लाख अधिक २० लाख म्हणजे २ कोटी ३५ लाख विद्यार्थी असायला हवे होते; पण नव्याने केलेल्या 'पटांवरून' त्यांची



श्रीकृष्ण उमरीकर

संख्या कमी होऊन २ कोटी ९ लाख असल्याचे दिसते. म्हणजे विद्यार्थी संख्या ९ लाखांनी कमी झाली. म्हणजेच पटपडताळणी नसती तर शाळांत अंदाजे ३० लाख जास्त विद्यार्थी दाखवण्यात आले असते. जे दाखवले त्यातले ३० लाखांवर गैरहजर होते. म्हणजे पटावरून कमी केलेले 'बोगस' विद्यार्थी ३० लाख आणि पटपडताळणीतून गैरहजर असलेले ३० लाख असा अंदाजे ६० लाख विद्यार्थ्यांचा हा महाघोटाळा आहे.

शासन साधारणपणे ५० विद्यार्थ्यांच्या मागे एका शिक्षकाची नेमणूक करते. ६० लाख विद्यार्थ्यांच्या मागे अंदाजे १ लाख शिक्षक अतिरिक्त ठरणार! म्हणजे हे एक लाख शिक्षक अस्तित्वात नसलेल्या विद्यार्थ्यांना शिकवत होते. सरकार असे सांगते की एका विद्यार्थ्यावर रु. १२,०००/- दरवर्षी सरासरी खर्च होतो. म्हणजे अस्तित्वात नसलेल्या ६० लाख विद्यार्थ्यांवर दरवर्षी ७,२०० कोटी रुपये खर्च होत असतो. हे पैसे गेले कुठे?

तसेच अनुदानीत शाळेवर आपली नियुक्ती व्हावी म्हणून शिक्षक संस्थाचालकांना किंवा संस्थेला ५ ते १५ लाख रुपये 'आर्थिक मदत' म्हणून देतात असे सर्वत्र बोलले जाते. ते खरे का खोटे हे शिक्षणाच्या व्यवसायात नोकऱ्या विकणारे आणि विकत घेणारे यांनाच माहीत. म्हणजे या अतिरिक्त शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात अंदाजे ५,००० ते १५,००० कोटी रुपयांची उलाढाल झाली असावी.

दरवर्षी अंदाजे २०-३० हजार शिक्षकांची नियुक्ती होत असावी असे समजल्यास केवळ नियुक्त्यांचा बाजार १,००० ते ४,५०० कोटी रुपयांचा आहे हे दिसून येते. या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांवर खर्च होत असलेल्या इतर रकमेचा विचार करता दरवर्षी सरकारचे निदान ३,०००-४,००० कोटी काळ्या पैशांत भर घालण्यासाठी खर्च होतात तसेच शिक्षकांकडून येणारे इतर असे निदान १०,००० कोटी रुपये शिक्षणक्षेत्रात भ्रष्टाचार करणाऱ्यांच्या घशात जातात आणि त्यावरूनच विविध शिक्षण संस्था 'चालवण्यात' राजकारण्यांना अधिक रस का आहे हे स्पष्ट होते.

शासनाने केलेल्या पटपडताळणीमुळे हा हजारो कोटींचा घोटाळा उघड झाला आहे. त्यावरचा उपाय सोपा आहे. या आधीच याच सदरात चर्चा केल्याप्रमाणे 'आधारचा' आधार घेरून बरेच घोटाळे रोखता येतील. शिक्षणक्षेत्रातील हा महाघोटाळा संपविण्यासाठी आधारच आधारभूत ठरेल याचा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. कसे ते पाहू...

देशातल्या बऱ्याच नागरिकांना त्यांचा आधार क्रमांक देण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. जर शाळेत जाणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याची हजेरी त्याच्या 'आधार' क्रमांकावरून नोंदवण्यात आली तर बोगस विद्यार्थी अस्तित्वातच राहणार नाहीत. कल्पना करा की रोज शाळा भरत असताना सर्व विद्यार्थी आणि शिक्षक आपली हजेरी एका यंत्रावर नोंदवत आहेत. हे यंत्र त्यांच्या अंगठ्याचा ठसा पाहून त्यांची ओळख पटवू शकते. जेवणाच्या सुटीत आणि शाळा सुटताना पुन्हा सगळे आपली हजेरी नोंदवत आहेत. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाला शाळेत पूर्णवेळ उपस्थित राहावेच लागेल. त्याचसोबत बोगस विद्यार्थ्यांच्या संख्येलाही आळा बसेल. एका मिनिटात ५-१० विद्यार्थी आपली हजेरी नोंदवू शकतात. १०० विद्यार्थ्यांची हजेरी नोंदवण्यासाठी १५-२० मिनिटे पुरेशी आहेत. जर ती जास्त वाटत असतील तर जास्त यंत्रे बसवून हजेरीचा वेळ कमी करता येऊ शकतो. ही यंत्रे मोबाईल फोनशी जोडून हजेरीची नोंद हव्या त्या कार्यालयाच्या संगणकात करता येऊ शकते. इतकेच काय शाळेत आज किती मुले उपस्थित आहेत ते पाहून त्यांना द्यायच्या पोषण आहारासाठी तो बनवणाऱ्यास तसा आदेश देता येईल. त्यामुळे आहारातलाही घोटाळा संपुष्टात येईल. हजेरी नोंदवण्याची यंत्रणा बसवण्याचा खर्च दरवर्षी होणाऱ्या भ्रष्टाचारापेक्षा कमी आहे. त्यासाठी सरकार स्वतः कर्ज घेऊन किंवा खासगी कंपनीस कंत्राट देऊन अशी यंत्रणा राबवू शकते. प्रश्न सरकारच्या इच्छाशक्तीचा आहे.

यदाकदाचित सरकारने तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचाराला आळा घातलाच तर ते निचित स्वागतार्ह आहे; पण त्यातून एक गंभीर प्रश्नही उभा राहणार आहे. भ्रष्टाचाराच्या मिषाने का होईना अनेक संस्थाचालकांनी हजारो शाळा उभ्या केल्या आहेत. त्या शाळांत अत्यंत निकृष्ट का होईना, पण शिक्षण दिल्या जात आहे. जर भ्रष्टाचाराचे आमीष नसल्यामुळे या संस्थाचालकांनी शाळा उघडण्यात, असलेल्या चालू ठेवण्यात रस नाही दाखवला, तर आपल्या देशात आधीच गंभीर झालेला शिक्षणाचा, त्याच्या दर्जाचा प्रश्न जास्तच गंभीर होईल. सरकारने या शक्यतेचा जरूर विचार करावा; कारण बहुतांश संस्थाचालकांनी केवळ समाजसेवेसाठी आपल्या संस्था चालू केलेल्या नाहीत हे उघडगुपीत आहे! आणि म्हणूनच शाळा चालवण्याची मूळ प्रेरणा, म्हणजे पैसा, जर बाजूला सारण्यात आली तर शाळा चालवायच्या कोणी आणि कशाला?

तसे पाहिले तर शिक्षणापेक्षा मनुष्याला अन्न-वस्त्र-निवारा यांची गरज असते. रेशनवर मिळणारे धान्य आणि गावोगावच्या पाणी पुरवठा योजना यांचा सरकारने कसा बट्ट्याबोळ केला आहे ते सर्वांनाच माहीत आहे. वस्त्र आणि निवारा या बाबतीत सरकार काही करत असल्याचे कोणास माहीत नाही. आरोग्यसेवेची अवस्थाही दयनीय आहे. कुठे दवाखाना नाही तर कुठे डॉक्टर नाही. दोन्ही असले तर औषधे नाहीत आणि जिथे तीनही असते तेथील औषधे निकृष्ट दर्जाची असल्यामुळे त्यांचा गुण येत नाही अशी अवस्था आरोग्यसेवेची आहे. सरकारने रेशन व्यवस्था आणि शिक्षण या क्षेत्रांकडे 'खास' लक्ष पुरविले, कारण तेथून नियमित उत्पन्न घेता येते!

यावरही उपाय शोधावाच लागेल. सरकार कोणतेच काम पारदर्शक पद्धतीने करत नाही, सरकारच्या सर्व योजना असतातच मुळी भ्रष्टाचाराला वाव देण्यासाठी हे नव्याने समजावून द्यायची गरज नाही. तसे नसते आणि सरकारला जर कार्यक्षमतेने काम करायचेच असते तर सरकारच्या एकूण खर्चातील ८५% खर्च कर्मचाऱ्यांच्या पगारावर नसता झाला!

शिक्षणासाठी सरकारने राबविलेले धोरण कुचकामी ठरले आहे यात शंका नाही. प्रथम या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात जे दिसून आले ते धक्कादायक आहे. हेच पाहा ना- तिसऱ्या वर्गातल्या ५०% पेक्षा कमी मुलांना पहिल्या वर्गातले धडे वाचता येतात! पाचव्या वर्गातल्या केवळ ५३% मुलांना तिसऱ्या वर्गातले धडे वाचता येतात! पाचव्या वर्गातल्या केवळ ३५% मुलांना साधा भागाकार करता येतो. पहिल वर्गातल्या केवळ ६५% मुलांना १-९ या संख्या ओळखू येतात. तिसरीतल्या केवळ ३६% मुलांना दोन अंक संख्यांची वजाबाकी करता येते आणि म्हणून खेड्यातील मुले सरकारी शाळा सोडून खाजगी शाळांत जाण्याचे प्रमाण वाढले आहे. सरकारी शाळांत शिकणाऱ्या मुलांत ट्युशनला (शिकवणीला) जाण्याचे प्रमाण जास्त आहे तर खाजगी शाळात जाणारे कमी मुले शिकवणी लावतात; पण ज्या खाजगी शाळांत पैसे घेऊन शिक्षकांची भरती केल्या जाते तेथील शिक्षकांची कुवत मर्यादित असल्यामुळे त्यांचे शिकविणे सुमारच असते. त्यामुळे खेडी सोडून शहराकडे जाण्याचे प्रमाण वाढत आहे.

आपल्या देशाला विविध क्षेत्रातील विद्वानांचा वारसा लाभलेला आहे. आपले अभियंते परदेशात उत्तम कामगिरी करत आलेले आहेत ते आपल्या शिक्षणाच्या जोरावर. मात्र गेल्या काही वर्षांत अतोनात झालेल्या भ्रष्टाचारामुळे शिक्षण व्यवस्था पार कोलमडली आहे. याचा वाईट परिणाम आपल्या मनुष्यबळावर होणार आहे आणि त्याचा दूरगामी परिणाम आपल्या अर्थव्यवस्थेवरही होऊ

शकतो हे ओळखून शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल करणे गरजेचे आहे.

आज शिक्षण क्षेत्रावर सरकारची पोलादी पकड आहे. नवी शाळा उघडण्याचे काम मोठे कठीण आहे. शिक्षण खात्याला योग्य ते खाऊ घातल्या शिवाय नवी शाळा चालू करता येत नाही. पुन्हा सरकारकडून येणारे अनुदान मिळवण्यासाठी पुन्हा देणे-घेणे करावेच लागते. याचा परिणाम असा होतो की शाळा सुरू करणे, ती चालवणे यासाठी शिक्षण क्षेत्रातले तज्ज्ञ-जाणकार हे रस घेत नाहीत तर ज्यांच्याकडे देण्या-घेण्यासाठी लागणारा 'जास्तीचा' पैसा आहे अशीच माणसे जास्त करून शाळा चालवतात. हे थांबलेच पाहिजे. त्यासाठी सरकारने शाळेची परवानगी देण्याचे नियम बदलले पाहिजेत.

गेल्या ५-६ वर्षांपासून इयत्ता आठवीच्या नवीन वर्गास परवानगी देण्यात आलेली नाही. २००३ साली हजारो विनाअनुदानित शाळा सुरू करण्यात आल्या. त्या सर्व शाळांतील विद्यार्थी आता नवव्या वर्गात शिकत आहेत आणि सरकारने त्यांतील बहुतांश शाळांना केवळ सातवीपर्यंतचीच परवानगी दिलेली आहे. सरकारच्या असल्या भोंगळ कारभारामुळेच शिक्षणाचे तीन-तेरा वाजले आहेत.

जसे नवीन दवाखाना उघडण्यासाठी कोणतीही खास परवानगी लागत नाही तसेच नव्या शाळेसाठी मात्र संस्था नोंदणी करणे, प्रस्ताव दाखल करणे, शहरात एक एकर आणि ग्रामीण भागात दोन एकर जागा स्वत:ची असणे हे असले नियम कशासाठी? किती सरकारी शाळा या नव्या नियमांची पुर्तता करतात? जे ज्ञानदानाचे काम शाळांत चालते तेच शिकवणी (ट्युशन क्लास) मध्ये चालते. मग हे क्लास नियंत्रीत करण्यासाठी सरकार काय करते? शाळा-कॉलेजमधील सरकारी हस्तक्षेपामुळे तेथील शिक्षणाचा दर्जा घसरतच चालला आहे. अकरावी-बारावीमधील मुले कॉलेजमध्ये न जाता केवळ ट्युशन क्लासमध्ये शिकतात. कॉलेजचे प्राध्यापक फुकटचा पगार घेतात असे चित्र बहुतांश जागी दिसते. मग असली महाविद्यालये चालवायची कशाला?

यावर सरळसोपा उपाय आहे. सरकारने ज्याला हवी त्याला शाळा सुरू करण्याची परवानगी द्यावी. शाळेने पुरविलेल्या भौतिक सुविधांच्या प्रमाणात शाळेला आकारण्याची परवानगी द्यावी. तसेच शाळांचे नॅकच्या धर्तीवर मूल्यांकन करावे. शाळांचे करणाऱ्या नियंत्रणात ट्राय-नॅक-विद्युत नियामक मंडळ यांच्याप्रमाणे स्वायत्त असाव्यात. त्यांची काम करण्याची पद्धत संपूर्णपणे पारदर्शक असावी. तसेच तंत्रज्ञानाची मदत घेऊन त्यांच्या कामाच्या नोंदी सर्वांना सहज पाहता येतील अशी व्यवस्था करावी.

**खरे तर शिक्षण म्हणजे केवळ काही पुस्तके शिकून परीक्षेत जास्तीत जास्त गुण घेणे नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाची एक प्रक्रिया आहे; पण आजकाल गुणवत्तेला कवडीचेही मोल राहिले नसून केवळ परीक्षेतल्या गुणांकडे सर्वांचे लक्ष आहे आणि त्यामुळेही शिक्षणाचा दर्जा घसरत चालला आहे. जे पालक-शिक्षक यांना या सत्याची जाणीव आहे ते सर्वांगिण विकास करणाऱ्या शाळा शोधतील-चालवतील. ज्यांना ती नाही ते आपल्या पाल्याला एखाद्या ट्युशन क्लासमध्ये पाठवून तेथूनच परीक्षा द्यायला लावतील. खुल्या बाजारपेठेच्या धोरणामुळे ग्राहकाला काय हवे ते निवडण्याचा आणि व्यापाऱ्याला त्याला ज्यातून फायदा आहे असे काहीही विकायचा अधिकार मिळतो. बस्स हा अधिकार कायद्याच्या कक्षेत राहून विशिष्ट नियमांच्या चौकटीत राहून वापरल्या जातो आहे का नाही एवढेच सरकारने बघावे.**

शिक्षणाचे खाजगीकरण झाले तर मोठी आपत्ती येणार आहे असे सर्वत्र बोलल्या जाते; पण सरकारी यंत्रणा शिक्षण देण्यात कुचकामी ठरली आहे हे दिसल्यावर लोकांनी आपला हट्ट सोडला पाहिजे. शिक्षणाचा दर्जा सुधारायचा असल्यास त्याचे खासगीकरण करणे हाच एक मार्ग आहे हे स्पष्ट आहे.

जे विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या कमजोर आहेत त्यांना सरकारने शिक्षणाची कुपन्स द्यावीत. ही कुपने त्या विद्यार्थ्यांनी आपल्या पसंतीच्या शाळात जमा करावीत. शाळांना या कुपनांचे पैसे बँकेतून मळतील अशी व्यवस्था करण्यात यावी किंवा प्रत्येक विद्यार्थ्याच्या नावाने शाळेच्या खात्यावर एक ठराविक रक्कम दरमहा जमा करण्यात यावी. तो विद्यार्थी ज्या शाळेत जाईल त्या शाळेच्या खात्यावर ते पैसे जमा होतील. त्यामुळे विद्यार्थ्यास शाळा निवडीची संधी राहील. ज्या शाळेला विद्यार्थी हवेत त्या शाळेस आपला दर्जा उत्तम राखावा लागेल. त्यामुळे निकोप स्पर्धा होऊन शिक्षणाचा दर्जा सुधारू शकतो.

सरकारने स्वत: विद्यार्थ्यांचे मूल्यमापन मात्र स्वतंत्र व्यवस्थे करावे. ज्या विद्यार्थ्यांनी किमान पात्रता नाही मिळवली त्यांच्या अनुदानात कपात करण्यात यावी. त्यामुळे विद्यार्थी अभ्यासाकडे लक्ष देतील. शाळांतीलच काय; पण खाजगी ट्युशन क्लासमधील मुलांनादेखील सरकारकडून मूल्यमापन करून घेता येईल असे पाहावे. त्यामुळे कदाचित काही मुले शाळांत न जाता केवळ ट्युशन क्लासमध्येच जातील आणि आपला वेळ वाचवतील.

खरे तर शिक्षण म्हणजे केवळ काही पुस्तके शिकून परीक्षेत जास्तीत जास्त गुण घेणे नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाची एक प्रक्रिया आहे; पण आजकाल गुणवत्तेला कवडीचेही मोल राहिले नसून केवळ परीक्षेतल्या गुणांकडे सर्वांचे लक्ष आहे आणि त्यामुळेही शिक्षणाचा दर्जा घसरत चालला आहे. जे पालक-शिक्षक यांना या सत्याची जाणीव आहे ते सर्वांगिण विकास करणाऱ्या शाळा शोधतील-चालवतील. ज्यांना ती नाही ते आपल्या पाल्याला एखाद्या ट्युशन क्लासमध्ये पाठवून तेथूनच परीक्षा द्यायला लावतील. खुल्या बाजारपेठेच्या धोरणामुळे ग्राहकाला काय हवे ते निवडण्याचा आणि व्यापाऱ्याला त्याला ज्यातून फायदा आहे असे काहीही विकायचा अधिकार मिळतो. बस्स हा अधिकार कायद्याच्या कक्षेत राहून विशिष्ट नियमांच्या चौकटीत राहून वापरल्या जातो आहे का नाही एवढेच सरकारने बघावे.

शिक्षणाहून जास्त आवश्यक अशा आरोग्य-अन्न-पाणी या सेवांचे खासगीकरण वेगाने झाले आहे. सरकार त्यावर कसलेही प्रभावशाली नियंत्रण करत नाही. आज जसे नळाचे पाणी नको असले तर तर पाणी बाटलीतून विकत मिळते, सरकारी दवाखान्याची पायरी चढायची नसली तर खाजगी दवाखाने उघडे आहेत, रेशनचे धान्य नको असले तर इतर दुकानातून ते घेता येते. कोणीही डॉक्टर हवे तेथे आपला दवाखाना उघडतो. तो सरकारला परवाना मागत नाही. कोणीही दुकानदार कोठेही आपले दुकान उघडू शकतो, कोणीही हॉटेलवाला आपले हॉटेल मनाप्रमाणे चालवू शकतो. त्याचप्रमाणे कोणाही पालकाला-शिक्षकाला हवे तेथे शाळा उघडण्याचा अधिकार मिळावा. सरकारने नियामकाची-मूल्यपानाची कामे करावीत. तसेच दुर्बल घटकांना आवश्यक ती आर्थिक मदत स्वच्छ-पारदर्शक मार्गाने भ्रष्टाचाराशिवाय पुरवावी. त्या शिवाय शिक्षणसेवेच्या दर्जात सुधारणा होणे अशक्य आहे.

**श्रीकृष्ण उमरीकर**
नानल पेठ, परभणी.
umrikar@gmail.com

■■

# आता कापूसही पेटणार!

**पश्चिम महाराष्ट्र हा उसाचा पट्टा आहे आणि याच पट्ट्यात या आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी ज्यांनी त्यांचे घामाचे दाम नाकारले त्यांनाच पुन्हा मतदान करून सत्तेच्या किल्ल्या थेट ग्रामपंचायतपासून तर दिल्लीच्या संसदेपर्यंत त्यांच्या हातात देऊन टाकल्या तर दरवर्षी उसाच्या दरासाठी होणारी रास्ता रोको आंदोलने किंवा उपोषण करणाऱ्या शेतकरी नेत्यांचा जीव पणाला लावणार आहात काय? सरकार २४ तासांत सगळं काही विसरून जातं. शेतकऱ्यांच्या मनात तरी हे प्रश्न किती दिवस राहणार आहेत. निवडणुकींच्या वावटळीत शेतीमालाच्या भावाचा प्रश्न पुन्हा एकदा उडून जाईल, की परिचिम महाराष्ट्रामध्ये भावी काळात होणाऱ्या सर्व निवडणुका या उसाचा आणि इतर शेतीमालाचा भाव यांच्याशी जे राजकारण खेळले गेले, त्यांच्याशी शेतकरी काही राजकारण आणि डावपेच खेळणार आहेत काय?**

ऊस आंदोलनाच्या यशानंतर आता कापूसही पेटणार, याची स्पष्ट चिन्ह दिसू लागली आहेत. शरद जोशींनी संपूर्ण विदर्भ आणि मराठवाडा ढवळून काढला आहे. अमरावती, नांदेड, वर्धा इत्यादी ठिकाणी विभागीय कापूस परिषदा आयोजित करून आंदोलनाची पुढील दिशा जाहीर करण्यात आली आहे. त्याचाच परिणाम म्हणून विदर्भ आणि मराठवाड्यात दिनांक १४ आणि १५ नोव्हेंबरला ठिकठिकाणी रास्ता रोको करण्यात आला आहे. शासनाला येत्या अठ्ठेचाळीस तासांत कापसाच्या प्रश्नावर निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा संघटनेने दिला आहे.

या वर्षी ऊसाचे अतिरिक्त उत्पादन आणि केंद्राने लावलेली निर्यातबंदी सरकारने मागील वर्षीपेक्षाही या वर्षी जाहीर केलेली फक्त १४५० रुपयांची हमी किंमत शिखर बँकेने सहकारी बँकांमार्फत जे साखर कारखाने हमी पेक्षा अधिक भाव देतील त्यांना कर्ज दिले जाणार नाही अशी दिलेली तंबी मागील वर्षाचा शिल्लक साठा अशी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची वाताहत झाल्याने ऊस उत्पादक शेतकरी प्रचंड चिडीने रस्त्यावर उतरला. एवढेच नव्हे तर केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या बारामतीतच जाऊन धडकला. रस्त्यावरचे आणि बारामतीचे आंदोलन याचा परिणाम होऊन सरकारने हमी भावामध्ये पहिला हप्ता १८०० ते २०५० एवढा वाढवून दिला. सहकारी साखर कारखान्यांची परिस्थिती बघता यापैकी फक्त वीसच साखर कारखाने हा पहिला हप्ता देण्याच्या आर्थिक परिस्थितीत आहेत. बाकीच्या साखर कारखान्यांना पुन्हा शेतकऱ्यांबरोबर मागच्या वर्षी ज्याप्रमाणे पहिल्या हप्त्याचेही काही पैसे थकवले. दुसरा हप्ता अद्याप दिला नाही, असे छक्के पंजे खेळावे लागले. हमी भाव जाहीर होऊनही तो मिळेलच याची शाश्वती नाही, हे शेतकऱ्यांनी लक्षात ठेवावे.

सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील आंदोलन काळात वारंवार आम्ही आता बोलणी करू, सरकारशी बोलू (?) अशा पद्धतीने वेळ मारून नेण्याचा आणि आंदोलनकर्ते शेतकरी थकतात की काय? याची वाट पाहत होते. आपल्या घामाचे दाम लुटले जात आहे हे लक्षात आल्यामुळे शेतकऱ्यांनी अजिबात माघार घेतली नाही. आंदोलनाची धार अधिकाधिक तीव्र होत गेल्यामुळे सरकारला शेवटी नमते घेऊन हमीभाव जाहीर करावा लागला. लबाडाचं आवतण जेवल्याशिवाय खरं नाही याची जाणीव मात्र शेतकऱ्यांनी ठेवावी. उसाचे गाळप झाल्यानंतर पुन्हा पैशांसाठी कारखान्यावर गेल्यावर आपल्यासाठी कुणी चेक घेऊन बसले आहेत अशा समजुतीत राहू नये. सर्व राजकीय पक्ष ऊस आंदोलनापुरते शेतकऱ्यांकडे लक्ष देत होते. ऊस आंदोलनाचे सूप वाजल्यानंतर लगेचच संपूर्ण महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि महानगरपालिकांच्या निवडणुकांचा फड कसा जिंकायचा याकडे त्यांचे लक्ष लागले आहे. बैठका, मेळावे सुरू झाले आहेत. चोवीस तासांच्या आत राजकीय पक्ष आणि सरकार शेतकऱ्यांना विसरून गेले आहेत. शेतकरी काय करतात, या निवडणुकांमध्ये काय भूमिका घेतात हे पाहणेही मोठे गमतीचे ठरणार आहे. पश्चिम महाराष्ट्र हा उसाचा पट्टा आहे आणि याच पट्ट्यात या आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी ज्यांनी त्यांचे घामाचे दाम नाकारले त्यांनाच पुन्हा मतदान करून सत्तेच्या किल्ल्या थेट ग्रामपंचायतपासून तर दिल्लीच्या संसदेपर्यंत त्यांच्या हातात देऊन टाकल्या तर दरवर्षी उसाच्या दरासाठी होणारी रास्ता रोको



ज्ञानेश्वर शेलार

आंदोलने किंवा उपोषण करणाऱ्या शेतकरी नेत्यांचा जीव पणाला लावणार आहात काय?

सरकार २४ तासांत सगळं काही विसरून जातं. शेतकऱ्यांच्या मनात तरी हे प्रश्न किती दिवस राहणार आहेत. निवडणुकींच्या वावटळीत शेतीमालाच्या भावाचा प्रश्न पुन्हा एकदा उडून जाईल, की पश्चिम महाराष्ट्रामध्ये भावी काळात होणाऱ्या सर्व निवडणुका या उसाचा आणि इतर शेतीमालाचा भाव यांच्याशी जे राजकारण खेळले गेले, त्यांच्याशी शेतकरी काही राजकारण आणि डावपेच खेळणार आहेत काय?

ऊस आंदोलनाच्या यशानंतर कापूस उत्पादकांच्याही हमीभावाच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. सरकारने तेहतीसशे रुपयांचा हमीभाव जाहीर करून टाकला आहे. सध्या फेडरेशनच्या माध्यमातून कोठेही खरेदी सुरू करण्यात आलेली नाही. खासगी व्यापारी खेडा खरेदीमध्ये ४४००च्या आसपास भाव देत आहेत. हमीभावाची आणि खासगी व्यापाऱ्यांच्या भावाची सध्याचीच तफावत एक हजार रुपयांची आहे. मागील वर्षी शेतकऱ्यांना ६००० ते ७,५०० रुपयांपर्यंत भाव मिळाला. त्यातूनच या वर्षी किमान हमीभाव हा सहा हजार रुपये असावा, अशी रास्त मागणी कापूस उत्पादक करीत आहेत. सरकारने मात्र त्यांच्या या मागणीला आपण काहीच किंमत देत नाहीत. हे दाखवण्यासाठीच फक्त तेहेतीसशे रुपयांचा भाव आधीच जाहीर करून टाकला आहे.

मागील वर्षी शेतकरी संघटनेने ऑक्टोबरच्या शेवटीच म्हणजे दिवाळीच्या अगोदरच धरणे आंदोलन जाहीर केले होते. फक्त औरंगाबाद, जळगाव आणि नागपूर या तीनच ठिकाणी आंदोलन झाले. या आंदोलनात हमीभाव किमान पाच हजार रुपये असावा व निर्यातबंदी ताबडतोब उठवावी, या दोन प्रमुख मागण्या होत्या. त्याचा धसका घेऊन सरकारने हमीभाव जरी वाढवला नव्हता तरीसुद्धा निर्यात खुली केली होती. अर्थात त्यातही कोटा पद्धतीची मेख मारून ठेवली होती. ८५ लाख गाठींची निर्यात क्षमता असताना फक्त ५५ लाख गाठींनाच परवानगी दिली. ५५ लाख गाठींची निर्यात झाली. आंदोलन हंगामाच्या सुरुवातीलाच केल्यामुळे फायदा असा झाला की, खासगी व्यापाऱ्यांनीही चांगला भाव दिला. मागील वर्षी अमेरिका, कॅनडा, रशिया या सर्व मोठ्या कापूस उत्पादक देशांमध्ये नैसर्गिक आपत्तींमुळे कापसाचे उत्पादन कमी होते. हेही भारतीय कापसाला चांगला भाव मिळण्याचे एक कारण होते. आपल्याकडेही पाऊस-पाणी चांगले झाल्यामुळे कापसाचे उत्पादन भरघोस झाले आणि भावही चांगला मिळाला.,

या वर्षी मात्र कापूस उत्पादनाचे चित्र फारसे उत्साहवर्धक नाही. पावसाची उशिरा झालेली सुरुवात, पेरणीला झालेला उशीर, माघारी पावसाची शेतकऱ्यांनी वाट पाहिली; परंतु तो पडलाच नाही. या सर्व कारणांमुळे कापसाचे उत्पादन घटणार आहे. साधारणतः १५ लाख हेक्टरवरील पीक कमी पावसामुळे आणि विजेची टंचाई, रसशोषक अळीचा प्रादुर्भाव यांमुळे संकटात सापडले आहे. सुमारे ४० लाख क्विंटल कापसाच्या उत्पादनाची घट होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ४ हजार कोटींचा फटका बसण्यात होणार आहे. कृषी विभागाने ३०० लाख क्विंटल उत्पादन होईल असा अंदाज व्यक्त केला होता; परंतु त्यामध्ये वरील घट होऊ शकते. त्यातच सरकारने कापूस उत्पादकांशी छक्केपंजे खेळण्याची सुरुवात केली आहे. ऊस उत्पादक पट्ट्यात गेल्या दहा महिन्यांत सहाशे बासष्ट शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यातील सर्वाधिक प्रमाण काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष माणिकराव ठाकरे यांच्या जिल्ह्यात आहे.

पणन महासंघाचे अध्यक्ष हिराणी येथून पाठीमागे वेगवेगळी आकड्यांची कसरत करून हमीभाव कसा योग्य आहे, असे सांगण्याचा नेहमी प्रयत्न करीत असत. यावर्षी मात्र टीव्हीवर दिलेल्या मुलाखतीत त्यांनी स्वतःच शेतकऱ्यांना किमान ६,००० रुपये भाव मिळाला तरच त्यांचा उत्पादन खर्च भरून निघेल आणि आम्ही यासाठी कृषी विभागाकडे प्रयत्न करीत आहोत, अशी कबुली दिली आहे. सहकार मंत्री, कृषी मंत्री हे पश्चिम महाराष्ट्रातील असल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा त्यांच्यावर त्वरीत परिणाम होतो. कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा त्यांच्यावर फारसा परिणाम होत नाही, असे चित्रही सध्या दिसत आहे. कारण ही सर्व मंडळी कापसाचे नावही घ्यायला तयार नाहीत. निवडणुकांच्या तयारींमध्ये ते सर्व मश्गुल आहेत.

सत्तेत नसलेल्या पक्षांनी (उदा. भाजप, शिवसेना, मनसे) ऊस आंदोलनात शेतकरी संघटनेबरोबर आपणही असल्याचे दाखवून दिले. मात्र ज्या ज्या ठिकाणी त्यांच्या ताब्यात कारखाने आहेत त्या ठिकाणी त्यांनी या अगोदरच आपला भाव जाहीर करायला हवा होता. तसे त्यांनी केले नाही! सरकार जो भाव ठरविल तो आम्ही निश्चितच देऊ अशा प्रकारची भूमिका घेतली. याचे उदाहरण म्हणजे पैठण येथील वैद्यनाथ एकनाथ सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाच्या शुभारंभप्रसंगी शेतकरी संघटनेने मोळी अडवली तेव्हा गोपीनाथ मुंडेंनी भाव जाहीर न करता सरकार जो भाव जाहीर करील. तो आम्ही निश्चित देऊ असे म्हणून वेळ मारून नेली. मुंडे यांच्या ताब्यात सध्याही जे जे कारखाने आहेत, त्यांनी तेथे ऊस आंदोलनानंतरही आम्ही किमान सरकारी भाव तरी देऊ, असे जाहीर केलेले नाही. शिवसेनेच्या ताब्यात कारखाने नाहीत. त्यामुळे त्यांनी विरोधी पक्षाची भूमिका म्हणून ऊस आंदोलनात सहकार्य केले. कापूस आंदोलनातही ते आपल्याला दिसतील. मनसेने शहरी वातावरणातून बाहेर पडण्यासाठी असे काहीतरी करणे आवश्यक असल्यामुळे आंदोलनाला सहकार्य केले; परंतु त्याचबरोबर मनसेने मुंबईमध्ये स्वस्त धान्य आणि भाजीपाल्याच्या गाड्या सुरू केल्या आहेत. त्यांनी इतर कुठल्याही वस्तुंऐवजी शेतीमालच स्वस्त विकण्याची प्रथा पुढे चालविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. एकीकडे शेतीमालाला भाव मिळाला पाहिजे म्हणून शेतकऱ्यांबरोबर आंदोलनात उतरायचे आणि दुसरीकडे शहरामध्ये स्वस्तात माल कसा विकता येईल यासाठी साखळी उभी करायची. हा दुटप्पीपणा आहे. खरे तर शेतीमाल विक्री करणे हा कुठल्याही राजकीय पक्षाचा अजेंडा होऊ शकत नाही; पण कोणाला काहीच सापडले नाही तर, गहू, तांदूळ, तेल, भाज्या इ. स्वस्त करून, महागाई कमी करून आमचा पक्ष गरिबांच्या बाजूने आहे- एवढाच अजेंडा शिल्लक राहतो. बाकीच्या करण्यासारख्या गोष्टी- वीज, पाणी, रस्ते, वैद्यकीय सेवा या अधिक उत्तम कशा चालतील हे कोणी पाहायचे, हे राजकीय पक्षांनाच माहीत नाही. निवडणुका जवळ आल्यामुळे सर्वच विरोधी पक्ष, कापूस आंदोलनातही शेतकरी संघटनेच्या बरोबर रस्त्यावर उतरलेले दिसले तर सत्तेत बसल्यानंतर याच शेतकऱ्यांना पुन्हा पुढच्या वर्षी रस्त्यावर उतरायला भाग पाडण्यास हे पक्ष मागेपुढे पाहणार नाहीत. सध्या निदान जो आमच्याबरोबर लढेल, शेतीमालाच्या भावासाठी रस्त्यावर उतरेल तो आमचा भाऊ निवडणुकीत आम्हीही पाहून घेऊ अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली तर चुकीचे ठरणार नाही!

**ज्ञानेश्वर शेलार**

मो. ९२२६७९७०१८

■■

# हे काय चालले आहे?


[ नेहरू घराणे दिल्लीत आणि आम्ही आमच्या गल्लीत हे काँग्रेसमधल्या प्रादेशिक सुभेदारांचे यशस्वी सूत्र आहे. जनतेची भाषा न येणारा, प्रादेशिक राजकारणाची गुंतागुंत न कळणारा काँग्रेस नेता त्यांनाही हवा असतो. एकदा त्याची मर्जी सांभाळली म्हणजे आपल्या राज्यात/ मतदारसंघात (राजीव गांधींचे समव्यवसायी असल्यामुळे कलमाडी कुठून कुठे आणि आता कुठेतरीच किती वेगाने पोचले!) काय हवे ते करता येते. नेहरू-गांधी ही दिल्लीतली घराणेशाही उचलून धरली की, आपल्या राज्यात, विभागात, मतदारसंघात, जिल्ह्यात, तालुक्यात, गावात नि:संकोचपणे आपल्या घराण्याचा सर्वंकष (!) उत्कर्ष साधता येतो. ]

जवाहरलाल नेहरूंच्या मृत्यूनंतर लाल बहादूर शास्त्री पंतप्रधान झाले खरे; पण त्यांच्या मंत्रिमंडळात इंदिरा गांधी नभोवाणीमंत्री झाल्या. शास्त्रींच्या आकस्मिक निधनानंतर मोरारजींचा पराभव करून इंदिरा गांधली सलग अकरा वर्षे पंतप्रधान. जनता पक्षाची अडीच वर्षे सोडली तर त्यानंतर पुन्हा पाच वर्षे पुन्हा इंदिराबाईच! त्यांच्या हत्येनंतर (संजय गांधी आधीच अपघातात गेला होता म्हणून) राजीव गांधी अत्यंत लोकप्रिय पंतप्रधान. मधली व्ही.पी. सिंग आणि चंद्रशेखर यांची नगण्य कारकीर्द वगळता राजीव गांधींचा बॉम्बस्फोटात मृत्यू झाल्यानंतर सोनिया गांधी काँग्रेसची सूत्रे घ्यायला तयार नव्हत्या म्हणून आणि राहूल-प्रियंका वयाने लहान होते म्हणून नरसिंहराव (काँग्रेसचे असून काँग्रेसवाल्यांना नकोसे असलेले) पंतप्रधान, पुन्हा देवेगौडा, गुजराल, वाजपेयी यांची एकूण सात-आठ वर्षे वगळता सोनिया गांधींच्या कृपेने (पुन्हा एकदा काँग्रेसवाल्यांना नकोसे असलेले) मनमोहन सिंग आणि आता सोनियांना दुर्धर आजार झाला आहे म्हणून राहुल गांधी प्रथम काँग्रेस अध्यक्ष आणि २०१४ सालच्या निवडणुकीत काँग्रेसला पुन्हा बहुमत मिळाले तर पंतप्रधान आणि त्याची थुंकी झेलणारा काँग्रेस अध्यक्ष! हे काय चालले आहे? शंभर कोटींच्या वर लोकसंख्या असताना गेली ७० वर्षे (नेहरू लाहोर काँग्रेसचे अध्यक्ष झाल्यानंतर) देशाचे नेतृत्व एकूण १०-१५ वर्षे वगळता एकाच कुटुंबाकडे कसे काय राहते. भारतमातेची कूस इतकी वांझ झाली आहे का, की दुसऱ्या कोणाकडेच देशाचे नेतृत्व करण्याच्या क्षमता नाहीत? वस्तुनिष्ठपणे पाहिले तर नरसिंहराव, वाजपेयी, मनमोहन सिंग (निदान पहिली पाच वर्षे) यांची कामगिरी नगण्य नक्कीच नव्हती; पण ते तिघेही संपूर्ण देशातल्या जनतेला नेहरू, इंदिरा, राजीव यांच्याइतके आवडले नव्हते हे स्पष्टच आहे, ते कशामुळे? भारतीय लोकशाही हा जगाने स्तिमित व्हावी असा राजकीय चमत्कार नक्कीच आहे; पण लोकशाहीच्या बुरख्याखाली एकाच कुटुंबाची मध्ययुगातच शोभली असती अशी घराणेशाही, हे आपल्या संसदीय लोकशाहीचे ढळढळीत अपयश नाही तर दुसरे काय आहे? आणि कोट्यवधी लोक ज्या पक्षाला मतदान करतात आणि लक्षावधी कार्यकर्ते ज्या पक्षात काम करतात, त्या काँग्रेसमध्ये हे प्रश्न कोणालाच पडत नसतील? या प्रश्नांपैकी शेवटच्या प्रश्नाचे उत्तर होय असे आहे. काँग्रेसवाल्यांना हे प्रश्न पडत नाहीत आणि घराणेशाहीच्या काँग्रेस पॅटर्नप्रमाणे स्वत:च्या कुटुंबीयांना राजकारणात उभे करू पाहणाऱ्या इतर पक्षांतल्या नेत्यांनाही पडत नाहीत, म्हणून तर कोणतेही नेतृत्वगुण नसताना उद्धव ठाकरे शिवसेनेचे कार्याध्यक्ष होतात, संतप्त चुलत भाऊ वेगळा पक्ष काढतो. भाजपमध्ये तेच, शेकापमध्येही तेच. इतर प्रादेशिक पक्षांचीही अवस्था फारशी वेगळी नाही. अजूनपर्यंत कम्युनिस्ट पक्षाला घराणेशाहीची बाधा फारशी झालेली दिसत नाही. (तरी डांगे कन्या रोझा देशपांडे एकदा खासदार झाल्या होताच.) पण पुढे काय होईल, हे सांगता येत नाही. कारण सोमनाथ चॅटर्जी प्रभृतींची पिढी जवळपास संपली आहे.



विनय हर्डीकर

राजकीय विश्लेषण करणारी मंडळी सोडली तर सर्वसामान्य भारतीयांनी नेहरू घराण्याचे वर्चस्व मान्य केलेलेच असते. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर राजीव गांधींनी सातरा शहरात सभा घेतली. एखाद्या मंगल कार्याला यावे तसे लोक बहुसंख्येने











**काँग्रेसचा गावपातळीवरचा पुढारी बाहेर पडतो तेव्हा तो सर्वांत पुढे, किंचित मागे अगदी जवळचे चमचे, त्यांच्यामागे सामान्य कार्यकर्ते व सर्वांत मागे जनता हेच दृश्य असते. देशपातळीवर नेतृत्वाचे दर्शन घडवताना हीच उतरंड असते. त्यात नेता जवाहरलाल, राजीव, सोनिया, राहुल यांच्यासारख्या परदेशी चेहरेपट्टी व मॅनर्सचा असला तर ते काँग्रेसवाल्यांच्या पथ्यावरच पडते.**

पांढरेशुभ्र कपडे घालून त्या सभेला आले होते. कोणीही उदास, निराश, मळकट चेहऱ्याची व्यक्ती त्या गर्दीत नव्हती. उत्कंठा, अपेक्षा आणि आदर याच तीन भावना सगळ्यांच्या मनात होत्या. राजीव गांधींचे हेलिकॉप्टर दिसताच संपूर्ण जमाव उठून उभा राहिला. हेलिकॉप्टरमधून एक हात बाहेर येताच सर्वांनी हात वर केले. व्यासपीठावर राजीव गांधी आणि त्यांची सिक्युरिटी सोडता, सातारा आणि कराड लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे फक्त दोन उमेदवार होते.

दहा-पंधरा मिनिटांचे भाषण संपवून हेलिकॉप्टर उडाले, पुन्हा सगळी सभा उठून उभी राहिली, तसेच हात वर झाले. सभेनंतर एका गटाला मी विचारले, 'कसं काय वाटलं?' उत्तर मिळाले ते असे, 'राज्य करावं तर या घरातल्या लोकांनीच करावं. आई मरून महिनासुद्धा झाला नाही, पण पोरगा घराबाहेर पडलाय, त्याच्या जिवाला धोका आहे, तरीही पडलाय, कारण आपल्या आज्यापासून चालत आलेलं, आपल्या आईनं केलेलं आपल्या घराण्याचं काम आपणपण करायचं, अशी जिद्द हाय.' मी तिथूनच दिल्लीला अरुण शौरींना तार केली की इंदिरा काँग्रेस दोनतृतीयांशपेक्षा जास्त बहुमत नक्की मिळवेल.

इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या तेव्हा नेहरूंची मुलगी ही एक ओळख सोडता त्यांच्याकडे काहीही नव्हतं. समाजवादी अर्थव्यवस्था स्वीकारण्याचा महत्त्वाचा निर्णय त्या काँग्रेस अध्यक्ष असताना झाला हे खरेच, पण तो निर्णय नेहरूंच्या हयातीतच झाला होता. समजा, नेहरू आणि शास्त्री गेले, त्या वेळेला फिरोज गांधी हयात असते तरीही पंतप्रधान इंदिरा गांधीच झाल्या असत्या. सोनिया गांधींना पंतप्रधान होण्याची गळ घालण्यात आली होती ती केवळ राहूल आणि प्रियंका पोरवयात होते म्हणूनच. राहुल गांधींचे अजून लग्न झालेले नाही. समजा, याच्यापुढे झाले तरी तो पंतप्रधानपद सोडेल (समजा, ते त्याला मिळालेच तर) तेव्हा त्यांची मुले किरकोळ वयाचीच असणार, मग काँग्रेसवाले काय करतील? एक तर प्रियंकाला पुढे करतील किंवा तोवर तिची मुले वयात आलेली असतील किंवा भाजप सगळी लाजलज्जा गुंडाळून

ठेवून वरुण गांधीला त्या पदावर बसवेल. नेहरू घराण्याचा भारतावर राज्य करण्याचा डिव्हाईन राईट भारतीय जनतेला मान्य आहे, कारण आपल्यासारखे दिसणारे, वागणारे, खाणारे-पिणारे राज्यकर्ते भारतीयांनी निदान एक हजार वर्षांत पाहिलेले नाहीत. हिंदी धड न बोलता येणे हा एरव्ही दोष असतो; पण नेहरू घराण्यातल्या माणसांना तो माफ असतो. (अगदी मोतीलाल, जवाहरलाल यांच्यापासून) त्या घराण्याचे इंग्रजी वळण भारतीयांना पसंत असते! आपल्या अंगावर भिकार लक्तरे असली तरी जवाहरलाल नेहरूंचे कपडे पॅरिसच्या लाँड्रीत धुतले जायचे याचा भारतीयांना अभिमान वाटतो.

आपला नेता नुसता सक्षम असून उपयोग नाही तो 'नेता दिसला' पाहिजे हे काँग्रेसवाले ओळखून असतात. भाजप-समाजवाद्यांसारखे कार्यकर्त्यांच्या गळ्यात गळा घालून किंवा कम्युनिस्टांप्रमाणे शोषित जनतेपेक्षाही जास्त भणंग दिसून ते आपल्या लोकप्रियतेचे पुरावे देत नाहीत. काँग्रेसचा गावपातळीवरचा पुढारी बाहेर पडतो तेव्हा तो सर्वांत पुढे, किंचित मागे अगदी जवळचे चमचे, त्यांच्यामागे सामान्य कार्यकर्ते व सर्वांत मागे जनता हेच दृश्य असते. देशपातळीवर नेतृत्वाचे दर्शन घडवताना हीच उतरंड असते. त्यात नेता जवाहरलाल, राजीव, सोनिया, राहुल यांच्यासारख्या परदेशी चेहरेपट्टी व मॅनर्सचा असला तर ते काँग्रेसवाल्यांच्या पथ्यावरच पडते.

काँग्रेसजनांची तर ही संस्कृतीच आहे. सोनिया गांधी यांच्या परदेशीपणाचा मुद्दा उपस्थित करून वेगळी चूल मांडण्यापर्यंत मजल गाठणारे शरद पवारही मुलगी की पुतण्या या घोळात अडकले आहेतच. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांत पुतण्याकडे चुलत्याची सर्व बरीवाईट गुणसंपदा जावी हा एक विचित्र योगायोग! आंध्रात रामारावचा जावई किंवा रेड्डींचा मुलगा/पत्नी असेच समीकरण आहे आणि हे आजचे नाही, पूर्वापार असेच चालत आले आहे.

'जवाहर माझा राजकीय वारस आहे' असे गांधी म्हणाले होतेच; पण पंचविशीचा पोरसवाद जवाहर गांधींच्या इतक्या निकट पोहोचला तेव्हा मोतीलाल नेहरूंची काँग्रेस नेमकी कोणाची होती? जमीनदार, इंग्रजांनी मोडीत काढलेले संस्थानिक, त्यांची कोर्टातली प्रकरणे हाताळणारे धनाढ्य वकील, नफेखोरी करणारे व्यापारी आणि काही मोजके सरकारधार्जिणे कारखानदार यांचाच त्या काँग्रेसेवार पगडा होता. स्वतःचे पैसे घेऊन येणाऱ्यांच्या हातातच तिची सूत्रे होती. अशा काँग्रेसकडे जनसमुदाय खेचून आणणारे टिळक आर्थिक बाबतीत कफल्लकच होते. टिळकांचा वारसा घेऊन काँग्रेसला व्यापक चळवळीचे स्वरूप देणारे गांधीही तसेच कफल्लक होते. त्यामुळे त्यांची घराणेशाही निर्माण होणे शक्यच नव्हते. या देशामधली श्रीमंत मंडळी तेव्हापासून आजपर्यंत काँग्रेसवर पगडा ठेवून होती व आहेत, त्यांनाही नेहरू घराणेच जवळचे वाटते यात शंका नाही. अपवाद गेल्या १०-१५ वर्षांचा. ज्या काळात नरसिंहराव, वाजपेयी व मनमोहन सिंग यांनी आर्थिक उदारीकरणाचा पाया घातला आणि उद्योजकांना नेहरू घराण्याचे अवास्तव महत्त्व वाटण्याचे प्रमाणे घटले तरीही गेल्या चाळीस वर्षांत सर्वाधिक आर्थिक उलाढाल करणारे अंबानी घराणे नेहरू घराण्याच्या कायम जवळचेच होते, हे सर्वांना माहीत आहे. गंमत अशी, की एक संघ परिवार व भाजप सोडता (मुख्यतः देशाच्या फाळणीमुळे-घराणेशाहीचा तिटकारा असल्यामुळे नाही) इतर राजकीय पक्षांनादेखील नेहरू घराण्याचेच अनावर आकर्षण आहे. नेहरू हे लोकशाही समाजवाद्यांचे (लोहियावाद्यांचा अपवाद वगळता) आदर्श पुरुष होतेच. अगदी आचार्य अत्र्यांनीदेखील संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात नेहरूंना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून आगपाखड केली असली तरी नेहरू गेल्यानंतरच्या अग्रलेखांच्या मालिकेत त्यांचे नेहरू फिक्सेशन ऊतू गेलेच होते. ठाकऱ्यांचा आणीबाणीला आणि इंदिरा गांधींना भक्कम पाठिंबा होताच. मूळ अविभाजित कम्युनिस्ट पक्षाची भूमिका ही नेहरू स्वीकारायचीच होती. एकीकडे काँग्रेसने केलेली (की काँग्रेसच्या हातात अलगद पडलेली) लोकशाही क्रांती ही भांडवलदारीच्या - सरंजामशाहीच्या पकडीमधून मुक्त करून तिला जनक्रांतीचे स्वरूप देण्याची गरज आहे, असे बिनचूक विश्लेषण करूनही सर्व कम्युनिस्ट विचारवंत/ विश्लेषक केवळ हिंदुत्ववादी पक्षांशी वैर घेतल्यामुळे त्यातल्या त्यात निदान पुरोगामी, समाजवादी भाषा बोलणाऱ्या नेहरूंकडेच व नंतर इंदिरा गांधींकडे आशाळभूतपणे पाहातच होते. डावे कम्युनिस्ट मात्र वेगळे आणि शहाणेही ठरले, कारण हे नेहरू घराण्याच्या बेगडी पुरोगामीपणाचे ओझे टाकून दिल्याखेरीज त्यांना बंगाल आणि केरळ या मुख्य राजकीय प्रवासापासून बहुतेक वेळा वेगळे पडलेल्या राज्यांमध्ये सत्ता हस्तगत करता आली नसती!

नेहमीच उपस्थित केल्या जाणाऱ्या एका प्रश्नाचे उत्तरही तेच आहे. प्रत्येक राज्यामधले बलदंड काँग्रेस पुढारी हे नेहरू घराण्याचे वर्चस्व झुगारून का देत नाहीत? यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय प्रवासाकडे नजर टाकली तरी याचा उलगडा होईल. १९६८-६९ ते १९७९ या काळात चव्हाणांनी हे वर्चस्व झुगारण्याचा आटोकाट प्रयत्न केला हे मान्य! मात्र तेही इंदिरा गांधींच्या यशस्वी पुनरागमनानंतर 'देशाच्या जनतेने जर इंदिराजींना स्वीकारले आहे तर मला तो कौल मान्य केलाच पाहिजे' असे समर्थन करून स्वगृही परतलेच होते. तसाच भरघोस पाठिंबा राजीव गांधींना मिळाल्यानंतर १९८६ मध्ये शरद पवारही निमूटपणे 'काँग्रेसवासी' (अत्र्यांची शब्दयोजना) झालेच, पुन्हा पुन्हा वेगळी वाट धरून त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाची वाट लावण्याचे महत्कार्य पार पाडले असले तरी सोनिया गांधींच्या खुर्चीला खुर्ची लावून दिल्लीत बसण्यात त्यांना धन्यता वाटतेच!

नेहरू घराणे दिल्लीत आणि आम्ही आमच्या गल्लीत हे काँग्रेसमधल्या प्रादेशिक सुभेदारांचे यशस्वी सूत्र आहे. जनतेची भाषा न येणारा, प्रादेशिक राजकारणाची गुंतागुंत न कळणारा काँग्रेस नेता त्यांनाही हवा असतो. एकदा त्याची मर्जी सांभाळली म्हणजे आपल्या राज्यात/ मतदारसंघात (राजीव गांधींचे समव्यवसायी असल्यामुळे कलमाडी कुठून कुठे आणि आता कुठेतरीच किती वेगाने पोचले!) काय हवे ते करता येते. नेहरू-गांधी ही दिल्लीतली घराणेशाही उचलून धरली की, आपल्या राज्यात, विभागात, मतदारसंघात, जिल्ह्यात, तालुक्यात, गावात निःसंकोचपणे आपल्या घराण्याचा सर्वंकष (!) उत्कर्ष साधता येतो. म्हणून तर भारत नेहरू-इंदिरा-राजीव-सोनिया यांचा असतो. महाराष्ट्र चव्हाण आणि पवारांचा आणि पुणे विभाग वा जिल्हा अजितदादांचा. मात्र त्यातल्या महिला सुप्रियाताईंच्या! ग्वाल्हेर शिंदे घराण्याचे असते, रेणापूर-बीड मुंडे आणि घराण्याचे. मुंबई शिवसेनेची; पण नाशिक राज ठाकरेंचे! ही यादी वाढवण्यात अर्थ नाही.

त्यामुळे हे काय चालले आहे, असा प्रश्नच निरर्थक कांगावा वाटू शकतो. उद्या राहुल आणि प्रियंका या दोघांनाही सत्तेची हाव सुटली तर देशाचे विभाजन करा अशी मागणी करण्याइतकी निर्लज्ज सत्तालालसा काँग्रेसजनांनी दाखवली नाही तर देशाचे सुदैव म्हणावे लागेल!

**विनय हर्डीकर**
vinay.freedom@gmail.com

■■

# मुख्यमंत्र्यांचा अव्यापारेषु व्यापार

**[ अर्थशास्त्रीयदृष्ट्या वा बाजाराच्या संकल्पनेचा विचार करता ही योजना तद्दन कुचकामी ठरत असली तरी सत्ताधाऱ्यांच्या विकासाच्या संकल्पनेची त्यात पुरेपूर सोय करण्यात आल्याने कोट्यवधींची आर्थिक तरतूद, अनुदाने, बांधकामे, टेंडर्स, टक्केवारी या साऱ्या बाबींची व्यवस्थित पेरणी केल्याचे दिसते आहे. बॅ. अंतुले मुख्यमंत्री असताना प्रत्येक तालुक्याला दिलेली हुतात्मा स्मारके, त्यांच्या बांधकामापुरता दिसलेला उत्साह व आज या साऱ्या केंद्रांची झालेली दुर्दशा बघता, त्या प्रकाराची पुनरावृत्तीच होण्याची अधिक शक्यता वाटते. अर्थात सरकारला पण यातून फारसे दूरगामी निर्माण व्हावेसे वाटत नसल्याने प्रामाणिक करदात्यांच्या पैशाला फुटलेल्या अनेक पळवाटांपैकी ही एक असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ]**

अलीकडे आपल्याला गम्य असो वा नसो, वास्तवात व्यवहार्य-लाभदायक असो वा नसो, केवळ लोकानुनय असणाऱ्या घोषणा करण्याची राजकारण्यांमध्ये स्पर्धा लागलेली दिसते. एकंदरीत लोकांच्या मनातून उतरत चाललेल्या राजकीय व्यवस्थांना आलेल्या अपयशातून येणाऱ्या भयगंडापोटी अशा घोषणा होत असल्या तरी त्यातून या विषयांबद्दल प्रकट होणारे अज्ञान व शासन याप्रती किती गंभीर असल्याचे अधोरेखित होत असल्याने समस्यांचे निराकरण होण्याऐवजी गोंधळच निर्माण होत असल्याचे दिसते आहे. एरवी टेक्नोसॅव्ही म्हणून गौरवले जाणाऱ्या मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केलेल्या व्हिलेज मॉलसारख्या भोंगळ योजनेची घोषणा याच प्रकारात मोडते. अर्थशास्त्रीयदृष्ट्या वा बाजाराच्या संकल्पनेचा विचार करता ही योजना तद्दन कुचकामी ठरत असली तरी सत्ताधाऱ्यांच्या विकासाच्या संकल्पनेची त्यात पुरेपूर सोय करण्यात आल्याने कोट्यवधींची आर्थिक तरतूद, अनुदाने, बांधकामे, टेंडर्स, टक्केवारी या साऱ्या बाबींची व्यवस्थित पेरणी केल्याचे दिसते आहे. बॅ. अंतुले मुख्यमंत्री असताना प्रत्येक तालुक्याला दिलेली हुतात्मा स्मारके, त्यांच्या बांधकामापुरता दिसलेला उत्साह व आज या साऱ्या केंद्रांची झालेली दुर्दशा बघता, त्या प्रकाराची पुनरावृत्तीच होण्याची अधिक शक्यता वाटते. अर्थात सरकारला पण यातून फारसे दूरगामी निर्माण व्हावेसे वाटत नसल्याने प्रामाणिक करदात्यांच्या पैशाला फुटलेल्या अनेक पळवाटांपैकी ही एक असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.


तसे हायटेक वाटणाऱ्या मुख्यमंत्र्यांना कदाचित माहिती नसेल की, त्याला तुम्ही मॉल म्हणा की काही, अतिप्राचीन काळापासून खेड्यांमध्ये अस्तित्वात असणारी बाजारव्यवस्था सरकारची कुठलीही मदत न घेता सुखेनैवरीत्या चालू आहे. गावपातळीवरचा बाजार, पंचक्रोशीतला आठवडी बाजार व त्या भागातून उत्पादित होणाऱ्या मालाच्या मोठ्या पेठा अशी संरचना ही अनादी काळापासून कार्यरत असल्याचे दिसते. बाजाराच्या जागेवर



गिरधर पाटील

बांधलेले ओटे, पाणपोया व तीन दांड्यांच्या टोकाला बांधलेले वजनकाटे आजही या खेड्यांमध्ये पाहायला मिळतात. अगदी मुळापासून विचार करायचा झाल्यास बाजार ही संकल्पना सरकार या संकल्पनेपेक्षा अतिप्राचीन व मानवी आहे. आपल्या व्यवहारातदेखील अगोदर देवघेव म्हणजे बाजार आला, त्यानंतर कायदा व सुव्यवस्था आली. भारतीय वातावरणाचा विचार करू जाता या बाजारात शोषण व सावकारी व्यवस्थांचे प्राबल्य वाढत गेल्याचे दिसते. या साऱ्या व्यवस्थेचे सुंदर चित्रण व विश्लेषण म. जोतिबा फुल्यांनी करून ठेवले आहे. नंतरच्या काळात सावकारी पाशात सापडलेल्या शेतमालाची सुटका करण्यासाठी इंग्रजांनी शेतमाल खरेदी-विक्री नियमन नावाचा कायदा आणला. आजही हा कायदा बाजार समिती कायदा म्हणून ओळखला जातो. मात्र, इंग्रजांनी घालवलेल्या पाशवी सावकारांची जागा आता सरकारमान्य दलाल व राजकारणाचे अड्डे झालेल्या बाजार समित्यांनी घेतल्याचे दिसते आहे.

मुख्यमंत्र्यांना या विषयात हातच घालावयाचा होता तर यातील अनेक मुद्दे ऐरणीवर आलेले आहेत. संबंधित पणन व सहकार खाते बाजार समित्यांतील टगे राजकारणी आणि सोकावलेल्या दलालांच्या आहारी गेल्याने मूग गिळून गप्प




आहेत. या बाजारातील विकृतींवर कुठल्याही प्रकारे तोडगा निघत नसल्याने अन्यायग्रस्त शेतकरी आता उपोषणाच्या मार्गावर आहेत. गेल्या दहा वर्षांपासून मी या विषयावर लिहीत असून उपस्थित केलेल्या एकाही प्रश्नाला शासनाने अधिकृत उत्तर दिलेले नाही. माझ्या मते मुख्यमंत्र्यांना गंभीर होण्यासाठी एवढे पुरेसे आहे आणि या साऱ्या प्रश्नांची उत्तरे ते याच माध्यमातून जनतेसाठी देतील, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

(१) जागतिक व्यापार करारानुसार केंद्राने पारित केलेला शेतमाल बाजारात खुलेपणा आणणारा व शेतकऱ्यांना बाजार स्वातंत्र्य देणारा मॉडेल ॲक्ट महाराष्टल शासनाने स्वीकारला आहे काय?

(२) तो स्वीकारला असल्यास यावर विधानमंडळात चर्चा होऊन, राज्यपालांची सही होऊन स्वीकारला की आहे त्या कायद्यात जुजबी बदल करून त्यालाच आपण मॉडेल ॲक्ट म्हणत आहोत?

(३) या कायद्यानुसार शेतमालाच्या विक्री व वाहतुकीवरची बंधने हटवण्यात आलेली असली तरी आजही नाशिक-पुण्याचा शेतमाल मुंबईत का येऊ दिला जात नाही? सदरचा शेतमाल वाशीच्याच दलालांना ते सांगतील त्या भावात विकण्याची सक्ती कितपत कायदेशीर वा नैतिक आहे?

(४) एखादा शेतकरी हा व्यापारी वा एखादा व्यापारी हा शेतकरी नसू शकतो काय?आणि असल्यास त्याचा शेतमाल कुठेही विकण्याची परवानगी त्याला का नसावी? मुंबईत येणारा शेतमाल हा कोणाचा आहे हे ठरवणारी बाजार समिती कोण? आणि या बाजार समितीत पायही न ठेवता इतरत्र होणाऱ्या विक्रीवर खंडणी आकारण्याचा अधिकार या बाजार समितीला कोणी दिला?

(५) माथाडी कामगारांच्या नावाने दहशत पसरवून खंडणी देणाऱ्या गाड्या सोडण्याचा अधिकार या राजकीय नेत्यांना कोणी दिला? कायदा पाळणाऱ्या व हप्ता न देणाऱ्या गाड्यांवर हल्ले होत असताना पणन, सहकार व पोलिस खाते काय करते?

(६) ठिकठिकाणच्या बाजार समित्यांवरील अगदी सर्वोच्च न्यायालयात सिद्ध झालेल्या भ्रष्टाचाराला अभय देणाऱ्या स्थगित्या कशा दिल्या जातात?

(७) या साऱ्या प्रश्नांची उत्तरे देण्याचे उत्तरदायित्व सरकार मानते की नाही?

आज या क्षेत्रात अशा अनेक समस्या निर्माण झालेल्या असताना व्हिलेज मॉलसारख्या तद्दन फालतू योजना आणणारे मुख्यमंत्री, त्यांना हे सारे दिसत नाही वा माहीत नाही असे मानणे कठीण जाते. आज अगदी दुर्गम खेड्यातदेखील उत्पादक शेतकऱ्यांनी वाहतुकीच्या व पॅकिंगच्या व्यवस्था स्वबळावर उभारल्या आहेत. तेथे या तकलादू मॉल्सची मुळीच गरज नाही. इगतपुरीसारख्या आदिवासी भागातील शेतकऱ्यांचा भाजीपाला निर्यात होऊ लागलाय, हे सारे बाजार समित्यांचे अडथळे व शासनाचा कुठल्याही प्रकारचा पाठिंबा नसताना! सरकारला शेतकऱ्यांचे एवढेच भले करायचे असेल तर त्यांनी शेतकऱ्यांच्या मानगुटीवर बसलेल्या बाजार समित्या उठवाव्यात व त्यांना बाजार स्वातंत्र्य उपभोगू द्यावे. सरकारपेक्षा अनेक प्रकारचे हायटेक मॉल सरकारची दमडीही न घेता आपोआप उभे राहतील!!

*(दै. दिव्य मराठीमधून साभार)*

**डॉ. गिरधर पाटील**
girdhar.patil@gmail.com

■■

# मुलाखत : सौ. जयश्री पाटील

माजी अध्यक्ष महिला आघाडी, शेतकरी संघटना, महाराष्ट्र.

**मुलाखतकार - ज्ञानेश्वर शेलार**

शेतकरी संघटना महिला आघाडीच्या माजी अध्यक्षा सौ. जयश्री पाटील या दिनांक ५ व ६ ऑक्टोबर रोजी मोन्सॅन्टो कंपनीने अमेरिकेत आयोजित केलेल्या चर्चासत्रासाठी उपस्थित होत्या. बीटी तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात काय फायदा झाला, शेतकऱ्यांचे तंत्रज्ञान स्वातंत्र्य आणि नवीन तंत्रज्ञान शेतीत येऊ नये यासाठी सरकार करीत असलेले प्रयत्न, बहुराष्ट्रीय कंपन्या व भारतीय शेतकरी, बीटीचे पुढील तंत्रज्ञान आणि भारतात येणाऱ्या तंत्रज्ञानविषयक प्रकाश टाकणारी ज्ञानेश्वर शेलार यांनी त्यांची घेतलेली ही मुलाखत...

**प्रश्न : बीटीला सरकारने कसा विरोध केला? आणि त्याची कारणे काय?**

**सौ. जयश्री पाटील :** पेस्टिसाईड कंपन्यांच्या लॉबीच्या दबावाखाली येऊन आणि पर्यावरणवाद्यांच्या विरोधामुळे सरकारनेही बीटीला विरोध केला. बीटीमुळे फवारण्या कमी कराव्या लागतात. शेतकऱ्यांचा औषधांचा खर्च वाचतो. पेस्टिसाईड कंपन्यांचे त्यामुळे मोठे नुकसान होते. बीटीमुळे भारतातील पेस्टिसाईड कंपन्यांचा ३१ हजार कोटींचे दरवर्षी नुकसान होते. औषधांचा एवढा खर्च बीटीमुळे कमी झाला आहे. त्यामुळे पर्यावरणाच्या नावाखाली बीटीला विरोध करण्यात आला.

बीटीमुळे जमिनीची उत्पादकता कमी होईल, जनावरे मरतील, माणसे नपुंसक होतील, कॅन्सरसारखे भयानक रोग होतील, असा अपप्रचार भारतात करण्यात आला. भारतात बीटी दहा वर्षे उशीरा आली. शेतकरी संघटनेने यासाठी अथक दहा वर्षे लढा दिला. शेतकऱ्यांना बीटी वाण लावू द्यावे आणि त्याचे काय फायदे तोटे आहेत ते पाहू द्यावे. फवारण्या कमी झाल्यामुळे पर्यावरणाचा फायदाच होतो. बीटी कापसाच्या सरकीपासून निघालेले सरकी तेल लोक सर्रास आता खात आहेत. जनावरांना पेंड खाऊ घातली जाते व आपण त्यांचे दुध वापरतो. वर केलेले कुठलेही आरोप गेल्या आठ-दहा वर्षांत सिद्ध झालेले नाहीत. यावरूनच शेतकऱ्यांसाठी आपण काही संशोधन करीत नाहीत आणि दुसऱ्या देशांतील कंपन्यांनी जर केले तर त्यांनाही पर्यावरण किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांचा शिरकाव इत्यादी कारणास्तव अडवून ठेवले जाते. हे आपल्या सरकारचे धोरण आहे.

**प्रश्न : कोणत्या कार्यक्रमांतर्गत आपली ही अमेरिका भेट होती?**

**सौ. जयश्री पाटील :** मोन्सॅन्टो कंपनीने अमेरिकेतील मिसुरी स्टेटमधील



सेंट लुईस येथे दिनांक ५ आणि ६ ऑक्टोबर २०११ ला परिषद घेतली. बीटी तंत्रज्ञानाने जगभरातील शेतकऱ्यांच्या जीवनात फरक पडला? हे शोधण्याचा प्रयत्न मॉन्सॅन्टोने शेतकऱ्यांशी चर्चा करून केला. भारतातून मी कापूस शेतकरी, अर्जेंटिनातून एक सोयाबीन शेतकरी आणि अमेरिकेतून एक मका शेतकरी अशा तीन शेतकऱ्यांना निमंत्रित केले होते. तीनही पिकांमध्ये बीटी तंत्रज्ञान आलेले आहे. भारतात फक्त कापसाला परवानगी दिलेली आहे. मका व सोयाबीनला अद्याप परवानगी दिलेली नाही. वांग्यामध्येही बीटी तंत्रज्ञान आलेले आहे. त्यालाही भारतात परवागनी नाही.

**प्रश्न : अशा प्रकारचा हा कंपनीचा पहिलाच कार्यक्रम होता का?**

**सौ. पाटील :** होय, कंपनीने प्रथमच अशी परिषद आयोजित केली होती आणि अशा परिषदेत सहभागी होण्याचा माझाही हा पहिलाच प्रसंग होता.

**प्रश्न : आपली निवड कशामुळे करण्यात आली?**

**सौ. पाटील :** मी शेतकरी संघटनेचे काम करीत असल्याने व शेतकरी संघटनेने बीटी कापूस भारतात यावा यासाठी मोठे आंदोलन उभारले होते. बीटीला सर्व थरांतून विरोध होत असताना फक्त शेतकरी संघटनाच बीटी कापूस भारतात यावा यासाठी प्रयत्न करीत होती. मॉन्सॅन्टो बीटी वाण कापसाद्वारे भारतात आणण्याचा प्रयत्न करीत होती. सरकार त्याला विरोध करीत होते. २००३ मध्ये तर गुजरातमध्ये शेतकऱ्यांनी चोरून बीटीची लागवड केली. सरकारने शेताशेतांमध्ये पोलिस पाठवून कपाशीची झाडे उपटून टाकण्याचा व पीक नष्ट करण्याचा सपाटा लावला होता. शेतातील इतर वाणांपेक्षा ज्या वाणाला रोगाचा प्रादुर्भाव झालेला नाही व बोंडांची संख्या अधिक आहे, असे कपाशीचे पीक जेथे जेथे दिसेल तेथे ते उपटून टाकण्यात येत होते. हे सर्व पोलिस बंदोबस्तात चालू होते. शरद जोशींच्या नेतृत्वाखाली त्यावेळी संघटनेने मोठे आंदोलन उभारले व शेतकऱ्यांचे पीक वाचवले. या सर्व पार्श्वभूमीवरच माझी निवड करण्यात आली.

**प्रश्न : भेटीचा कार्यक्रम कसा होता?**

**सौ. पाटील :** प्रत्येक शेतकऱ्याला प्रश्न विचारून दोन मिनिटे वेळ देण्यात आला होता. मॉन्सॅन्टोला बीटी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी १४ वर्षे लागली. आपण केलेल्या संशोधनाचा शेतकऱ्यांना काय फायदा झाला? हे त्यांना शेतकऱ्यांच्या तोंडून ऐकायचे होते. ४ ऑक्टोबरला कंपनीचा संपूर्ण परिसर दाखविण्यात आला. या ठिकाणी कंपनीची मोठी प्रयोगशाळा असून इतर उत्पादने जगभरच्या त्यांच्या विविध विभागांत तयार केली जातात. बीटी जीन मात्र या प्रयोगशाळेत विकसित करण्यात आला. प्रयोगशाळा अत्यंत अद्ययावत असून काळजीपूर्वक संशोधन केले जाते. दिनांक ५ ऑक्टोबरला व्हिडीओ शुटींग करण्यात आली. प्रत्येक प्रतिनिधीला काही प्रश्न विचारण्यात आले. ही व्हिडीओ शुटींग मोन्सॅन्टो डॉट कॉम या वेबसाईटवर बघायला मिळते. दिनांक ६ ऑक्टोबरला प्रश्नोत्तरे व चर्चेचा कार्यक्रम झाला. हा कार्यक्रम जगभर लाईव्ह प्रसारित करण्यात आला.

**प्रश्न : तुम्हाला त्या ठिकाणी कोणत्या प्रकारचे प्रश्न विचारण्यात आले?**

**सौ. पाटील :** चर्चेमध्ये बीटीच्या संदर्भात विविध प्रश्न विचारण्यात आले. जसे की, स्वत:ची माहिती देणे याला मी माझे नाव सांगून भारतातून आलेली आहे, महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यातून वळकी शेंदणी येथील असून सध्या औरंगाबाद येथे राहते असे सांगितले. *तुमच्या भागातील जमीन कशी आहे? पिके कोणती घेतात असे त्यांनी विचारले.* यावर मी- आमच्या भागात कोरडवाहू व बागायती अशी शेती केली जाते. कापूस, तूर, मुग, उडीद, बाजरी, सोयाबीन इत्यादी पिके घेतली जातात. कापूस, ऊस, केळी ही नगदी पिके आहेत ती अधिक घेतली जातात. बागायती कापूस असेल तर पंधरा मे ते पंधरा जून व कोरडवाहू असेल तर पंधरा जूननंतर लागवड केली जाते, असे उत्तर दिले.

*बीटी येण्या अगोदर शेतकऱ्यांची परिस्थिती कशी होती, असे त्यांनी विचारले.* याला उत्तर देताना, शेतकऱ्यांचे जीवनात चांगले असे काहीच नव्हते. जवळजवळ दीड लाख शेतकऱ्यांनी आतापर्यंत आत्महत्या केल्या आहेत. या सर्व आत्महत्यांमध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. स्त्री आणि शेतकरी स्त्रीची हौसमौज कधीही होत नाही. लग्नानंतर पहिला दोन-तीन महिन्यांतच अंगावरच स्त्रीधन बँकेत गहाण ठेवून कर्ज काढावे लागते व शेतीत खर्च करावा लागत असे. असे वाटायचे की, आपण काहीतरी पाप केले असेल, म्हणून या जन्मी आपल्याला शेतकरी नवरा मिळाला. शेतकऱ्याच्या मुलाला कुणी मुलगी देत नव्हते, अशी शेतकऱ्यांची अवस्था होती.

*देशात तीन तंत्रज्ञाने आली- मोबाईल, इंटरनेट व बायोटेक्नॉलॉजी! शेतकऱ्यांच्या जीवनात यांमुळे काय फरक पडला?*

उत्तर देताना मी सांगितले की, तीनही तंत्रज्ञाने चांगली व उपयुक्त आहेत. मात्र शेतकऱ्यांच्या जीवनात बायोटेक्नॉलॉजीमुळे खरी क्रांती झाली. पूर्वी हायब्रीड व्हरायटी लागवड करायचो. त्याला पंचवीस ते तीस फवारण्या कराव्या लागत. बीटीमुळे तीन ते चारच फवारण्या करून उत्पन्न दुपटीहून जास्त वाढले. कीटकनाशकांमुळे होणारे प्रदुषण कमी झाले. उत्पादन खर्च कमी झाला. उत्पादन वाढले. शेतकऱ्यांना त्यांच्या गरजा भागवणे शक्य झाले. मोटरसायकल, ट्रॅक्टर इत्यादी शेतकऱ्यांच्या दारात आले. कोणी ठीबक सिंचन करून पाण्याची बचत केली, स्प्रिंकलर वापरायला सुरुवात झाली. चुलीवर स्वयंपाक करण्याऐवजी शेतकऱ्यांच्या घरात गॅस आला. करमणुकीचे साधन म्हणून टीव्ही आला. थोडी सुबत्ता आल्यामुळे घरातील कटकटी कमी झाल्या. मुलांना बाहेर तालुक्याच्या गावात शिक्षणासाठी पाठविणे शक्य झाले.

*मॉन्सॅन्टोच्या तंत्रज्ञानावर तुमचा किती विश्वास आहे?*

उत्तरादाखल मी सांगितले की, सुरुवातीला आम्ही घाबरत घाबरतच बीटी कापूस लावला. त्याचा अनुभव चांगला आला. भारत जगामध्ये कापूस उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर आला. मोन्सॅन्टोवर आम्ही स्वत: बीटी वापरून बघितल्यानंतर पूर्ण विश्वास बसला.

*कंपनीकडून तुमच्या आणखी कोणत्या अपेक्षा आहेत? कंपनीने तुमच्यासाठी आणखी काय करावे?*

यावर मी उत्तर म्हणाले की, अजूनही कापसावर रसशोषक किडींचा मोठा त्रास आहे. मजूर मिळत नाहीत. पाऊस जास्त पडला तर पिके खराब होतात. कमी पडला तर पिक येत नाही. यावर असे काही संशोधन करता येईल का, की ज्यामुळे पाऊस कमी पडला तरी किंवा जास्त पडला तरी पिकांवर परिणाम होणार नाही आणि उत्पादन चांगले येईल. लोकसंख्या वाढली आहे. जमीन मात्र तेवढीच आहे. कापसामध्ये ज्याप्रमाणे बीटी आणले. तसेच सर्व पिकांत बीटी आणणे शक्य आहे का? अशाप्रकारे मी माझ्या अपेक्षा व्यक्त केल्या.

यावर त्यांनी कंपनी सध्या कशाप्रकारचे संशोधन करीत आहे याची, सखोल माहिती दिली. कंपनीने बोलगार्ड २ वुईथ राऊंड अप रेडी फ्लेक्स व बोलगार्ड ३ वुईथ राऊंड अप रेडी फ्लेक्स अशा जाती शोधून काढल्या आहेत. बोलगार्ड २ मध्ये बोंडअळीबरोबरच ऊंट अळी व रसशोषक अळी



अजूनही कापसावर रसशोषक किडींचा मोठा त्रास आहे. मजूर मिळत नाहीत. पाऊस जास्त पडला तर पिके खराब होतात. कमी पडला तर पिक येत नाही. यावर असे काही संशोधन करता येईल का, की ज्यामुळे पाऊस कमी पडला तरी किंवा जास्त पडला तरी पिकांवर परिणाम होणार नाही आणि उत्पादन चांगले येईल. लोकसंख्या वाढली आहे. जमीन मात्र तेवढीच आहे. कापसामध्ये ज्याप्रमाणे बीटी आणले. तसेच सर्व पिकांत बीटी आणणे शक्य आहे का? अशाप्रकारे मी माझ्या अपेक्षा व्यक्त केल्या. यावर त्यांनी कंपनी सध्या कशाप्रकारचे संशोधन करीत आहे याची, सखोल माहिती दिली. कंपनीने बोलगार्ड २ वुईथ राऊंड अप रेडी फ्लेक्स व बोलगार्ड ३ वुईथ राऊंड अप रेडी फ्लेक्स अशा जाती शोधून काढल्या आहेत. बोलगार्ड २ मध्ये बोंडअळीबरोबरच ऊंट अळी व रसशोषक अळी यांचा बंदोबस्त होतो. हे औषध फवारल्यास त्याचा परिणाम फक्त कपाशीवर होतो. इतर पिकांवर होत नाही. बोलगार्ड ३ मुळे बोंड अळी, ऊंट अळी, गुलाबी अळी, रसशोषक अळी इत्यादी किडींचा बंदोबस्त होतो. इतर कोणतीही फवारणी करण्याची गरज नाही. तणावर फवारल्यास फक्त तणांवरच परिणाम होतो. त्यामुळे निंदनीची गरज नाही. याचे संशोधन झाले आहे; पण भारत सरकार परवानगी देत नाही, अशी माहिती दिली.

यांचा बंदोबस्त होतो. हे औषध फवारल्यास त्याचा परिणाम फक्त कपाशीवर होतो. इतर पिकांवर होत नाही. बोलगार्ड ३ मुळे बोंड अळी, ऊंट अळी, गुलाबी अळी, रसशोषक अळी इत्यादी किडींचा बंदोबस्त होतो. इतर कोणतीही फवारणी करण्याची गरज नाही. तणावर फवारल्यास फक्त तणांवरच परिणाम होतो. त्यामुळे निंदनीची गरज नाही. याचे संशोधन झाले आहे; पण भारत सरकार परवानगी देत नाही. तुम्ही सरकारवर दबाव टाका असे त्यांनी म्हटले. यावर मी, तुम्ही भारतात बोलगार्ड २ आणि ३ आणण्यासाठी काय प्रयत्न करणार? असे विचारले. त्यावर त्यांनी तुम्हीच तुमच्या सरकारवर दबाव टाका, आम्ही परवानगीसाठी कुठलेही प्रयत्न करणार नाहीत. सरकारने जर आम्हाला परवानगी दिली तरच हे वाण भारतात येईल. जगभर या वाणाचा प्रचार व प्रसार आणि वापर सुरू झालेला आहे, असे त्यांनी सांगितले.

सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानापासून वंचित ठेवीत आहे असे शेतकरी वारंवार सांगत आहेत. माझी या भेटीने सरकारच्या चुकीच्या धोरणांविषयी खात्रीच झाली.

**प्रश्न : या भेटीनंतर जे चित्र समोर आले आहे. ते शेतकऱ्यांच्या दृष्टीने फारसे आशादायक नाही. बीटीला येण्यासाठी जशी सातआठ वर्षे उशीर झाला व शेतकऱ्यांचे नुकसान झाले. बोलगार्ड २ आणि ३ यायलाही उशीर झाला तर भारतीय शेतकऱ्यांची मोठी हानी होईल. आपण यासाठी आता काय प्रयत्न करणार आहात?**

**सौ. पाटील :** पुण्याला २९ नोव्हेंबर रोजी यासाठी शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीत मुख्यतः बोलगार्ड २ आणि ३ हे भारतात यावेत, सरकारला परवानगी देण्यासाठी भाग पाडावे. यासाठी आंदोलनाची दिशा ठरविण्यात येणार आहे.

■■

# शेतकरी आंदोलनाची पुनर्मांडणी

**मोठ्या संख्येतील संपन्न असा नवा मध्यम वर्ग अन्नधान्याची व भाजीपाल्याची महागाई अजिबात सहन करायला तयार नाही. स्वत:च्या कद्रूपणाचे खापर राज्यकर्त्यांच्या भ्रष्टाचारावर फोडून आपली अपराधीपणाची भावना कमी करू पाहत आहे. शेतकऱ्याचे दारिद्र्य हे शेतीमालाचे भाव आणि व्यापार शर्तींतून आलेले नसून राज्यकर्त्यांच्या भ्रष्टाचारातून निर्माण झाल्याची नवी तकलादू आणि अशास्त्रीय कारणमीमांसा जोर पकडू लागल्याने शेतकऱ्याचा खरा प्रश्न पुन्हा मागे पाडण्याचा धोका वाढला आहे. म्हणूनच शेतकऱ्याचा प्रश्न नव्याने पुन्हा ताकदीनिशी मांडण्याची गरज निर्माण झाली आहे.**

अण्णा आंदोलनानंतर महाराष्ट्रात शेतकऱ्यांची विराट आंदोलने झालीत आणि होत आहेत; पण अण्णा आंदोलनाने भ्रष्टाचाराच्या प्रश्नाला जसे केंद्रस्थानी आणून बसविले तसे शेतकरी आंदोलनांना शेतकऱ्याचे प्रश्न केंद्रस्थानी आणता आले नाहीत. हे खरे आहे की, शरद जोशींच्या नेतृत्वाखालील शेतकरी आंदोलनाने शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नाला देशाच्या पटलावर केंद्रस्थानी आणून बसविले होते. शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भावाची संकल्पना सर्व गटा-तटांचा, डाव्या-उजव्यांचा विरोध मोडीत काढून मान्य करून घेण्यात ते आंदोलन यशस्वी झाले होते. अर्थात हे यश तत्वत: होते आणि या संकल्पनेला साकाररूप येण्याआधीच डंकेल प्रस्तावाच्या निमित्ताने शेतकरी संघटनेने जी हनुमान उडी मारण्याचा अकाली प्रयत्न केला त्याने रास्त भाव संकल्पनेचा गर्भपात झाला. ज्या रास्तभावाच्या संकल्पनेला मान्यता मिळावी म्हणून एक तप शेतकरी आणि शेतकऱ्यांची संघटना तन, मन आणि धनाने राबली आणि त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन या संकल्पनेला इतरांनी मान्यता दिली तेव्हा शेतकरी संघटनेने स्वत:च ही संकल्पना कालबाह्य ठरविली. त्यामुळे शेतीमालाच्या आधारभूत किमती सुनिश्चित करण्याची शास्त्रीय व तथ्याधारित पद्धत अस्तित्वात आणण्यासाठी प्रयत्न झालेच नाहीत. अशा पद्धतीअभावी आधारभूत किमती निश्चित करण्यात जो फरक पडला तो गुणात्मक नसून संख्यात्मक होता. पूर्वी वर्षाकाठी २-४ रुपयांनी वाढणाऱ्या आधारभूत किंमती २०-४० रुपयांनी वाढू लागल्या आणि निवडणुका जवळ असतील तर आकडा अधिक आकर्षक असू शकतो. शेतकरी आंदोलनाच्या परिणामी लुट कमी झाली; पण लुट होत राहील ही व्यवस्था तोडण्यात आंदोलन यशस्वी झाले नाही. राज्यकर्त्यांची सोय व मर्जी हा शेतीमालाचे भाव ठरविण्यातील निर्णायक घटक अबाधित राहिला. शेतकरी संघटनेने बाजारावर आधारित भावाचा पुरस्कार केला होता तो यासाठीच की, राज्यकर्त्यांच्या सोयी व मर्जीनुसार शेतकऱ्याची ससेहोलपट होऊ नये; पण शरद जोशी व शेतकरी संघटनेचा आशावाद भाबडा निघाला. जागतिक व्यापार संघटनेच्या नियमानुसार व्यापार झाला तर शेतकरी मुक्तीची पहाट लवकर होईल ही धारणा चुकीची म्हणता येणार नाही; पण जागतिक व्यापार संघटनेचे नियम व निर्णय तयार करणे, मानणे आणि अंमलात आणणे हे काम प्रचलित सरकारेच करणार आहेत याचे भान न ठेवल्याने शेतकरी मुक्तीची पहाट न उजाडता काळरात्र लांबली आहे. मनुष्यबळ, धन, तंत्रज्ञान आणि औद्योगिक उत्पादने यांची जागतिक आदान-प्रदान सुकर झाली व त्यांचा व्यापारही बऱ्याच अंशी मोकळा झाला आणि बहरला आहे; पण शेतीमालाच्या वाट्याला हे भाग्य अद्यापही आले नाही. शेती व्यापारासंबंधी वाटाघाटी खुंट्याला बांधल्यागत एकाच जागी फिरत आहेत. या वाटाघाटी लांबविण्यात आणि यशस्वी होऊ न देण्यात संपन्न राष्ट्रांनी चालविलेले प्रयत्न लक्षात घेतले तर तिसऱ्या जगातील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याची कुंजी जागतिक स्तरावर शेती व्यापाराच्या शर्थी बदलण्याशी निगडीत आहेत याचे संकेत नक्कीच मिळतात; पण या शर्थी बदलने शेतकरी संघटनांच्या किंवा शेतकऱ्याच्या हाती नसून सरकारांच्या हाती असल्याने सरकारवर सातत्याने दबाव ठेवण्याची



सुधाकर जाधव



व वाढविण्याची निकड असताना शेतकरी संघटनेने शेतीमालाच्या भावाचा प्रश्न सोडून जागतिक व्यापार संघटनेवर आशाळभूत भिस्त ठेवली. परिणामी देशांतर्गत सरकारवरचा दबाव सैल झाला आणि त्यातून शेतकऱ्याचा दुहेरी तोटा झाला. त्याला ना देशांतर्गत भाव मिळाला ना जागतिक बाजारपेठेत स्थान मिळाले. शेतकरी संघटनेच्या हातचे सोडून पळत्याच्या मागे लागण्याचा असा परिणाम झाला. शेतकरी अधिकाधिक खोलात गेला. आजची आंदोलने ही शेतकरी खोल बुडत चालल्याने त्याच्या नाकातोंडात पाणी जाऊ नये म्हणून त्याला हात देऊन थोडे वर उचलण्याचा प्रयत्न आहे. याने तो मरणार नाही; पण यातून त्याच्या जगण्याचा मार्गही प्रशस्त होणार नाही.

### आजची शेतकरी आंदोलने

आज शेतकरी समुदाय आंदोलनात दिसत असला तरी या आंदोलनांना शेतकरी आंदोलन म्हणणे सत्याला व तर्काला धरून होणार नाही. कारण 'शेतकरी तितुका एक' हे सूत्र या आंदोलनामध्ये अभावानेच आढळते. आता आंदोलने होताहेत ते पीक उत्पादकांचे, कर्जबाजारी लोकांचे, विजेच्या अभावाने व प्रचुर वीजबिलाने पीडितांचे! कांदा उत्पादकाचे आंदोलन कितीही मोठे झाले तरी त्याचे नाशिक किंवा पुणे याच्याबाहेरच्या शेतकऱ्यावर परिणाम होत नाही. ऊस आंदोलन कितीही मोठे झाले तरी विदर्भात त्याचे सोयरसुतक नसते, कापूस पेटला तरी त्यातील आग प.महाराष्ट्राला कधी जाणवत नाही. शेतकरी कोणतेही उत्पादन घेत असला तरी त्याच्या उत्पादनाला भाव मिळणार नाही कारण त्याला भाव न मिळण्यावर आजची व्यवस्था उभी आहे या तत्वज्ञानाचा विसर आता आंदोलनाच्या नेत्याला पडला आहे. यातून आपली चूल कशी पेटती राहील इकडेच आंदोलनाच्या नेत्याचे लक्ष असते. म्हणूनच आज शेतकऱ्यांची परिस्थिती बदलू शकणारे शेतकरी आंदोलन कुठेच नाही. आज जे काही चालले आहे त्याला तुकड्यासाठी तुकड्या-तुकड्याने चाललेली आंदोलने म्हणणे क्रमप्राप्त आहे. यातून शेतकऱ्यांची एकसंघ ताकद उभी राहत नसल्याने शेतकऱ्याची राजकीय ताकद वाढतच नाही. वाढत असली तर आंदोलनाच्या नेत्यांची राजकीय ताकद तेवढी काही प्रमाणात वाढते; पण मग यातून दुसराही धोका निर्माण होतो. शेतकरी दरिद्री राहण्यात जसे सरकार व सरकारवर प्रभुत्व असणारांचे हित निर्माण झाले आहे तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न कायमस्वरूपी सुटणार नाही याची अशा शेतकरी नेतृत्वाकडून काळजी घेतल्या जाऊ शकते. शेतकरी आंदोलन आज अशा धोक्याच्या वळणावर उभे आहे. दरवर्षी ऊस असो, कांदा असो, की कापूस असो प्रश्न सारखाच उभा राहतो आणि उत्तरही तात्पुरते शोधल्या जाणे आणि मान्य होणे याचा या पेक्षा वेगळा अर्थ लावल्या जाऊ शकत नाही. कांद्याचा प्रश्न नित्यनेमाने निर्माण होत असल्याचे आपण पाहिलेच आहे. गतवर्षी उसाचे जसे आणि ज्या कारणासाठी आंदोलन झाले तसेच सध्याही सुरू आहे. कापसाची वेगळी अवस्था नाही. आज पुन्हा रास्त भावाच्या मागणीसाठी शेतकऱ्याला रस्त्यावर उतरावे लागत आहे याचा अर्थ मोठमोठ्या शेतकरी आंदोलनांतून शेतकऱ्यांनी जे मिळविले त्याला ते टिकविता आले नाही. नव्या आर्थिक धोरणात शेतकऱ्यांना स्थान मिळणार नाही याची सरकार आणि शेतकरी नेते यांनी संगनमताने काळजी घेतली असे वाटण्यासारखी परिस्थिती आहे. कारण शेतकरी २५-३० वर्षांपूर्वी होता तिथेच आहे आणि तेव्हा त्याने जिथून सुरुवात केली होती त्याचीच आज त्याला नक्कल करावी लागत आहे. मात्र नव्या आर्थिक धोरणांनी त्याच्या हितशत्रूंची ताकद मात्र मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. यातून जी सिव्हिल सोसायटी निर्माण झाली आहे तिचा महागाईवर हल्ला हा प्रत्यक्षात शेतकऱ्यावरील हल्ला ठरत आहे. मोठ्या संख्येतील संपन्न असा नवा मध्यमवर्ग अन्नधान्याची व भाजीपाल्याची महागाई अजिबात सहन करायला तयार नाही. स्वतःच्या कद्रूपणाचे खापर राज्यकर्त्यांच्या भ्रष्टाचारावर फोडून आपली अपराधीपणाची भावना कमी करू पाहत आहे. शेतकऱ्यांचे दारिद्र्य हे शेतीमालाची भाव आणि व्यापार शर्थीतून आलेले नसून राज्यकर्त्यांच्या भ्रष्टाचारातून निर्माण झाल्याची नवी तकलादू आणि अशास्त्रीय कारणमीमांसा जोर पकडू लागल्याने शेतकऱ्याचा खरा प्रश्न पुन्हा मागे पडण्याचा धोका वाढला आहे. म्हणूनच शेतकऱ्याचा प्रश्न नव्याने पुन्हा ताकदीनिशी मांडण्याची गरज निर्माण झाली आहे; पण ठिकठिकाणच्या सुभेदारांनी तुकड्या-तुकड्यात आंदोलन करून प्रश्न मांडण्याची आणि रेटण्याची ताकद शेतकरी आंदोलनात येणार नाही. म्हणूनच वेगवेगळ्या दिशेने तोंड करून बसलेल्या शेतकरी कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन शेतकरी आंदोलनाची पुनर्मांडणी व पुर्नउभारणी केली पाहिजे. योगायोगाने नव्हे तर परिस्थितीच्या रेट्याने मतभिन्नतेतील भ्रामकपणा उघड होऊ लागला आहे. ज्यांना शेतीमालाच्या भावाचा प्रश्न कालबाह्य वाटत होता त्यासाठी त्यांना आता मेळावे



घेण्याची व आंदोलन करण्याची गरज वाटत आहे. तर ज्यांची जागतिक स्पर्धेत शेतकरी नागवला जाईल अशी ठाम धारणा होती ते शेतमालाच्या निर्यातीसाठी आग्रह धरू लागली आहेत, त्यासाठी आंदोलनाची भाषा बोलू लागली आहेत. म्हणूनच आंदोलनाच्या पुनर्मांडणी व पुनर्उभारणीसाठीची ही योग्य वेळ आहे आणि या क्षणी त्याची निकडदेखील आहे.

**आंदोलनाची दिशा**

शेतकरी आंदोलनाची पुनर्मांडणी करताना प्रामुख्याने दोन बाबी लक्षात घेण्याची गरज आहे. रास्तभावाशिवाय आंदोलन उभा राहू शकत नाही आणि नुसताच रास्त भावाचा प्रश्न रेटून शेती समस्या सुटणार नाही. खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली आज ऊस प्रश्नावर मोठे आंदोलन उभे राहिले आहे. त्यातील बलस्थाने व कमजोर जागा लक्षात घेऊन ढोबळमानाने शेतकरी आंदोलनाची उभारणी कशी होऊ शकते याचा विचार करणे शक्य आहे. ज्याला शेतकरी समुदायाला संपन्न व सक्षम करायचे असेल त्याला त्याच्या प्रश्नाची समग्र मांडणी करता आली पाहिजे. नुसता भाव मागून उपयोगाचे नाही. असा भाव सतत मिळत राहावा यासाठी संस्थात्मक व संरचनात्मक बदलाचा आग्रह नसेल तर आंदोलन ट्रेड युनियनच्या चळवळीपेक्षा वेगळे होत नाही. आजच्या ऊस आंदोलनात रास्तभावाची मागणी हे या आंदोलनाचे बलस्थान आहे; पण हे भाव मिळवायचे असतील तर अनेक मूलभूत बदल करणे गरजेचे आहे आणि अशा बदलासाठी हे आंदोलन अजिबात आग्रही नाही. राजकीय कोंडी करून अल्पकालीन लाभ पदरात पाडून घेणे शक्य असल्याने त्या दिशेने हे आंदोलन चालले आहे. उसासाठी ज्या भावाची मागणी होत आहे ती निश्चितच तथ्य व तर्कसंगत आहे; पण आजच्या स्थितीत तो भाव दिला तर साखर कारखाने दिवाळखोर होतील हे वास्तव नजरेआड करून चालत नाही. असा भाव मिळविण्यासाठी अनेक उपाययोजना कराव्या लागतील. महाराष्ट्रात तर प्रामुख्याने सहकार क्षेत्राबाबत पुनर्विचार करावा लागणार आहे. सहकारातून कारखानदारी उभी करून उस-कापूस यांसारख्या पिकांना भाव मिळवून देण्याच्या कल्पनेतून कारखानदारी उभी राहिली; पण शेतीमालाच्या भावाचा प्रश्न सहकार क्षेत्रासाठी गौण होऊन ते सत्ताप्राप्तीचे व सत्तेत टिकून राहण्याचे साधन तेवढे राहिले आहे. सहकारक्षेत्राने त्याचा उद्देश केव्हाच मोडीत काढला असल्याने आता आपल्याला सहकारक्षेत्रच मोडीत काढण्याचा विचार टाळता येणार नाही. किमान त्याचा सत्तेचे प्यादे असल्यागत गैरवापर होऊ नये यासाठी सत्ता आणि सहकार यांचा संबंध तोडण्यासाठी ठोस उपाययोजना केल्याशिवाय तरणोपाय नाही. सहकार चळवळ ही निखळ आर्थिक चळवळ झाल्याशिवाय त्यातून शेतकऱ्याचे हित साधल्या जाणार नाही याची उमज आणि समज आंदोलनात असणे गरजेचे आहे. त्याचा अभाव आजच्या आंदोलनात जाणवतो. दरवेळी उत्पादन खर्च भरून निघावा यासाठी आंदोलन करणे हा केवळ शेतकऱ्यांचा शक्ती क्षय करणारेच नाही तर उत्पादनात अडथळा व गोंधळ आणणारे आहे. म्हणून उत्पादन खर्च काढण्याचा मुद्दा अग्रक्रमाने निकालात काढायला हवा. हा मुद्दा निकालात काढायचा असेल तर त्यासाठी केंद्र सरकारविरुद्ध निर्णायक संघर्ष करण्याची रणनीती शेतकरी आंदोलनाला आखावी लागेल. उत्पादन खर्च आटोक्यात ठेवून उत्पादन वाढीसाठी शेतीक्षेत्रात नवनवीन शोधाचा व तंत्रज्ञानाचा वापर गरजेचा आहे. शेतकऱ्याच्या आंदोलनातून नव्या संशोधनासाठी व तंत्रज्ञानासाठी अनुकूल वातावरण निर्माण होणे आवश्यक मानले पाहिजे. नवे संशोधन म्हणजे केवळ संकरीत किंवा जेनेटिक बियाणे असा संकुचित अर्थ घेण्याचे कारण नाही. अगदी सेंद्रीय शेतीसाठीसुद्धा याची गरज आहे किंवा यासाठी जास्तच गरज आहे असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. कारण इंदिरा गांधी सत्तेत येईपर्यंत भारतात प्रामुख्याने सेंद्रीय शेतीच होत होती आणि ती शेती शेतकऱ्याला अधिकाधिक दरिद्री बनवितच होती हे विसरून चालणार नाही. या मुद्द्यांवर बारामतीत सत्याग्रह झाला असता तर ते योग्य दिशेने पाऊल ठरले असते. बाकी सगळ्या वस्तूंचे भाव बाजार निर्धारित करेल; पण शेतमालाचे भाव बाजारावर सोडता काम नये हा आग्रह शेतकऱ्यांसाठी मारक राहत आला आहे. शेतीमालाच्या भाव वाढीला जनतेच्या स्तरावर होणारा विरोध कमी करण्यासाठी लोकशिक्षणासोबत संघर्षाची तयारी ठेवावी लागणार आहे; पण निव्वळ देशांतर्गत बाजारावर विसंबून शेतीचा फायदेशीर व्यापार शक्य नाही. त्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापाराची कास धरावीच लागेल. म्हणून निर्यात बंदी हा शब्दच शेतीमालाच्या संदर्भात शब्द कोशातून काढावा लागेल आणि निर्यात फायद्याची व्हायची असेल तर व्यापार समान शर्थीवर झाला पाहिजे आणि यात जागतिक व्यापार संघटनेची भूमिका महत्त्वाची असेल हे नाकारून चालणार नाही. जागतिकीकरणाच्या बाजूने किंवा विरोधात असा विचार किंवा काथ्याकुट करीत बसण्यापेक्षा एवढ्या व्यापक आशयाची शेतकरी चळवळ उभी करणे ही आजची गरज आहे. आजचे केंद्र सरकार हे अत्यंत दुर्बल सरकार आहे. अशा दुर्बल सरकारकडून मनमानी पद्धतीने दुरगामी परिणाम करणाऱ्या मागण्या इंडियातील लोक एकजूट दाखवून पूर्ण करून घेत आहेत; पण भारतातील शेतकरी समुदाय मात्र आपल्या न्याय्य मागण्यांसाठी एकत्र येऊन आंदोलन करीत नसल्याने शेतीक्षेत्रातील संस्थात्मक, संरचानात्मक आणि तंत्रज्ञानात्मक बदल घडवून आणण्याची चालून आलेली संधी वाया घालवित आहे.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# गरिबी निर्मुलनाची क्षमता केवळ शेती व्यवसायातच

**[ उत्पादन वाढीसाठी जिवाचा आटापिटा करणे हा उत्पादकवर्गाचा मूलभूत पैलू असल्याने व शेतकरी हा उत्पादक वर्गामध्ये मोडत असल्याने वेळची कामे वेळेत उरकण्यासाठी प्रयत्न करणे हा गुण त्याच्या रक्तामांसातच भिनला असतो. उत्पादन वाढविण्यासाठी मजुरांची मदत घेणे क्रमप्राप्त ठरल्याने मग मजूर कमी आणि गरज जास्त अशी परिस्थिती उद्भवताच अकस्मात मजुरीच्या दरात प्रचंड उलथापालथ होते. शेतमजूरीची दरनिश्चिती सरकारच्या नियोजनामुळे ठरत नाही किंवा शेतमजुरांच्या युनियनने संप पुकारला म्हणून शेतमजुरीच्या दरात वाढ होत नाही तर शेतमजुरीच्या दरातील बदल मागणी-पुरवठ्याच्या सिद्धांतानुरूप बदलत असते. ]**

शेती व्यवसायातील गरिबी संपवायची असेल तर शेतीव्यवसायातून अतिरिक्त मनुष्यबळ कमी केले पाहिजे, असे वक्तव्य मागे एकदा एका शेतकरी मेळाव्यात बोलताना एका मंत्र्याने केले होते. त्याच दिवशी दुसऱ्या एका सभेत बोलताना शेतीव्यवसायाला बरकत येण्यासाठी शेतकऱ्यांनी जोडधंदे करायला हवेत, त्यासाठी शेतकऱ्यांना मदत करायला सरकार निधीची अजिबात कमतरता भासू देणार नाही, असेही जाहीर करून ते मोकळे झाले होते. दोन्ही वक्तव्यातून शेतीमध्ये प्रत्यक्ष कामाच्या गरजेपेक्षा अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध असल्याचे ध्वनित होते.

परंतु प्रत्यक्षात मात्र परिस्थिती याच्या अगदी उलट आहे. जे प्रत्यक्ष शेतीव्यवसायात आहेत किंवा ज्यांची नाळ प्रत्यक्ष शेतीव्यवसायाशी जुळलेली आहे त्यांना पक्के ठाऊक आहे की, शेतीमध्ये मनुष्यबळाची प्रचंड कमतरता आहे. अनेकवेळा शेतीची कामे एकाच हंगामात एकाच वेळी येत असल्याने मजुरांचा प्रचंड तुटवडा जाणवतो. पेरणी, लागवड, खुरपणी किंवा पिक काढणीसारखी कामे योग्य त्या वेळी करणे शक्य होत नाही. शेतीतील कामाच्या वेळापत्रकाला अनन्य साधारण महत्त्व असल्याने व वेळची कामे वेळेत न आटोपल्याने मग उत्पन्नात जबरदस्त घट येते. उत्पादन वाढीसाठी जिवाचा आटापिटा करणे हा उत्पादकवर्गाचा मूलभूत पैलू असल्याने व शेतकरी हा उत्पादक वर्गामध्ये मोडत असल्याने वेळची कामे वेळेत उरकण्यासाठी प्रयत्न करणे हा गुण त्याच्या रक्तामांसातच भिनला असतो. उत्पादन वाढविण्यासाठी मजुरांची मदत घेणे क्रमप्राप्त ठरल्याने मग मजूर कमी आणि गरज जास्त अशी परिस्थिती उद्भवताच अकस्मात मजुरीच्या दरात प्रचंड उलथापालथ होते. शेतमजूरीची दरनिश्चिती सरकारच्या नियोजनामुळे ठरत नाही किंवा शेतमजुरांच्या युनियनने संप पुकारला म्हणून शेतमजुरीच्या दरात वाढ होत नाही तर शेतमजुरीच्या दरातील बदल मागणी-पुरवठ्याच्या सिद्धांतानुरूप बदलत असते.

आजपर्यंत कामाच्या शोधात खेड्याकडून पावले शहराकडे धावायचीत; पण आता गेल्या काही वर्षांपासून अकस्मातच काळ बदलला आहे. गंगा उलटी वाहायला लागून वळणीचे पाणी आढ्यावर जायला सुरुवात झाली आहे. मोलमजुरी आणि कामधंदा शोधण्यासाठी शहरातील पावले गावाकडे वळायला लागली आहेत. आम्ही शाळा शिकत असताना आम्हाला सांगितले जायचे की, अमेरिकेतील मोलकरीण स्वतःच्या चारचाकी गाडीने भांडी घासायला मालकाच्या घरी जात असते, एवढा तो देश समृद्ध आहे. आम्हाला ते ऐकताना मोठे कुतूहल वाटायचे. एक दिवस भारतातील शेतमजूरही चारचाकी गाडीमध्ये बसून शेतावर काम करायला जाईल असे जर भाकीत त्याकाळी कुणी वर्तवले असते तर त्याची रवानगी थेट वेड्यांच्या इस्पितळात केली गेली असती; मात्र अगदी पंधरावीस वर्षांच्या काळातच इतिहासाला कलाटणी मिळाली असून शहरातील मजूरवर्ग चारचाकी वाहनात बसून थेट खेड्यात येऊन शेतीच्या बांधावरच उतरायला लागला आहे. फरक एवढाच की, अमेरिकेतील मोलकरीण भांडी घासायला मालकाच्या घरी स्वतःच्या चारचाकी गाडीने जात असते, आमचा मजूरवर्ग मात्र किरायाच्या गाडीने जातो. त्यासोबतच परप्रांतीयाचे लोंढेही आता गावामध्ये उतरायला लागले आहेत.



गंगाधर मुटे

मुंबई-पुण्यासारख्या शहरांना परप्रांतीयाचे लोंढे नकोनकोसे होत असताना आणि त्यांना हुसकावण्यासाठी शर्थीचे प्रयत्न होत असताना खेड्यात मात्र याच परप्रांतीयांचे दिलखुलासपणे स्वागत केले जात आहे. खेड्यातील शेतकरी परप्रांतात जाऊन तेथील कामगारांना आपल्या गावात येण्याचे निमंत्रण देऊ लागला आहे. गावामध्ये आल्यानंतर त्यांची निवासाची व्यवस्था राजीखुशीने करायला लागला आहे.

शेतमजुरीचे सतत वाढते दर आणि शेतकरी वर्गाकडून परप्रांतीयांचे स्वागत ह्या दोनही बाबी शेतीव्यवसायात मनुष्यबळाची प्रचंड कमतरता आहे, हे अधोरेखित करणाऱ्या आहेत. पण आमच्या शासनकर्त्यांचे पाय जमिनीला लागत नसल्याने वास्तविक स्थितीपासून ते बरेच लांब असतात. मध्ये जे वाचले, पाहिले त्या आधाराने ते मध्ये बोलत असतात. काळाचा प्रवाह सतत बदलत असतो, याचाही त्यांना विसर पडायला लागतो. त्यामुळेच मग त्यांना शेतीमध्ये अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध असल्याचा साक्षात्कार व्हायला लागतो.

औद्योगिक विकासासाठी शेतीमध्ये तयार होणारा कच्चा माल स्वस्तात स्वस्त भावाने उपलब्ध होईल अशाच तऱ्हेने स्वातंत्र्योत्तर काळात ध्येयधोरणे राबविली गेलीत तरीही बेरोजगारीचा प्रश्न सुटला नाही कारण भारतासारख्या प्रचंड जनसंख्या असलेल्या देशाला गरजेएवढा रोजगार पुरविण्याची क्षमता औद्योगिक क्षेत्राकडे कालही नव्हती, आजही नाही व उद्याही असणार नाही, हे जेवढे लवकर नियोजनकर्त्यांना कळेल तेवढे लवकर भारताच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने पाऊल पडण्यास सुरुवात होईल. शहरातील मनुष्य कामधंद्याच्या शोधात खेड्याकडे वळायला लागला, ही घटनाच मुळात शेतीव्यवसायामध्ये रोजगाराच्या अमाप संधी उपलब्ध करून देण्याची क्षमता असल्याचे द्योतक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात खेड्यांतील श्रमशक्तीचे शोषण करून शहरे फुलविणाऱ्या धोरणात्मक नियोजनकर्त्यांच्या मुस्कटात काळाच्या महिमेने सणसणीतपणे हाणलेली ही चपराक आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात शेतीकडे जर अक्षम्य दुर्लक्ष झाले नसते तर आज देशात वेगळे चित्र पाहायला मिळाले असते. शेतीमध्ये जर भांडवलीबचत निर्माण व्हायला लागली तर शेतीमध्ये रोजगाराचे अमाप दालन खुले होऊन देशाचा कायापालट होऊ शकतो. देशांतर्गत दूध आणि मांसाची आवश्यक गरज जरी पूर्ण करायची म्हटले तरी पशुपालन व्यवसायामध्ये प्रचंड रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. शेती करून किंवा शेतीशी निगडित व्यवसाय करून जर सन्मानजनक जीवन जगता आले तर सुशिक्षित बेरोजगारांची पावले एमआयडीसीऐवजी रानमाळाकडे वळू शकतात. एका घरात दोन भाऊ असतील तर एक भाऊ शेती आणि दुसरा भाऊ पशुपालन अशी विभागणी होऊन एका घरात दोन स्वतंत्रपणे व्यवसाय उभे राहू शकतात. उद्योगात किंवा कारखान्यात एक रोजगार निर्माण करायला कोट्यवधीची गुंतवणूक करावी लागते त्याउलट शेतीनिगडीत व्यवसायात केवळ दोन-तीन लक्ष रुपयांच्या भांडवली गुंतवणुकीत आठ-दहा लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. यातूनच ग्रामविकासाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते. गरिबी आणि दारिद्र्याचा समूळ नायनाट होऊ शकतो. हजारो कोटी रुपये खर्चाच्या भिकेच्या अनुदानात्मक योजना राबविण्याची गरजही संपुष्टात येऊ शकते.

आणि एवढे सगळे घडून येण्यासाठी शासनाला तिजोरीतून एक दमडीही खर्च करण्याची गरज नाही. एका दाण्यापासून हजार दाणे निर्माण करण्याचे सामर्थ्य मातीला आणि गवत-कडब्यापासून दूध निर्माण करण्याची कला गाई-म्हशीला निसर्गानेच दिलेली आहे. केवळ शेतीतून किंवा शेतीशी निगडित व्यवसायातून उत्पादित होणाऱ्या मालावर शासनकर्त्यांनी निष्कारण निर्बंध लादणे तेवढे थांबवले पाहिजेत.....

बस्स एवढेच पुरेसे ठरेल शेतीच्या विकासासाठी!

**गंगाधर मुटे**
आर्वी छोटी - ४४२३०७,
तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
www.baliraja.com, मो. ९७३०५८२००४

■■

शेतकरी महिला आघाडी

# संयुक्त कार्यकारिणीची बैठक

शेतकरी संघटना

**प्रिय मित्र,** स. न. वि. वि.

शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्ष यांची संयुक्त कार्यकारिणी **मंगळवार, दिनांक २९ नोव्हेंबर** पुणे शासकीय विश्रामगृह (इन्स्पेक्शन बंगला) पिंच गार्डन, पुणे रेल्वे स्टेशनजवळ, या ठिकाणी दुपारी १ वाजता बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे ही विनंती.

*** शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्ष यांच्या संयुक्त कार्यकारिणीतील विषय :** १. कर्जमुक्ती फॉर्म आणि स्वतंत्र भारत पक्ष नोंदणी आढावा घेणे. २. तंत्रज्ञानातील स्वातंत्र्य मिळावे म्हणून कापसाच्या राऊंडअप बीटी या वाणासाठी रणनीती आखणे व त्याची परवानगी मिळवणे. ३. कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये मॉडेल ॲक्टच्या अंमलबजावणीसाठी आंदोलन ठरवणे.

कळावे आपले,

**रवि देवांग**
अध्यक्ष, शेतकरी संघटना

**वामनराव चटप,**
अध्यक्ष, स्वभाप (महाराष्ट्र)

**सौ. जयश्री पाटील,**
अध्यक्ष, शेतकरी महिला आघाडी

**अनिल घनवट,**
अध्यक्ष, शेतकरी युवा आघाडी

**सौ. शैलजा देशपांडे,**
अध्यक्षा, स्वभाप महिला आघाडी

**संपर्क:** अनिल चव्हाणे मो. ०९४०५८४७४९३, आबासाहेब ताकवणे मो. ०९६८९७९००४८



# हाण त्याच्या टाळक्यात

ऊठ मर्दा ऊठ
आवळून घे मूठ
हाण त्याच्या टाळक्यात
पायामधला बूट

सत्तेपुढे शहाणपण
जेव्हा व्यर्थ जाते
माणुसकीचे लचके तोडून
लाचखोर खाते
पौरुषाच्या नशेचे, तेव्हा लाव दोन घूट
अन् हाण त्याच्या टाळक्यात, पायामधला बूट

अन्यायाची सीमा जेव्हा
मर्यादेला लांघते
तुझे हक्क तुडवून
तिरडीवर बांधते
शेपटी तेव्हा खाली नको, वाघासारखा ऊठ
अन्
हाण त्याच्या टाळक्यात, पायामधला बूट

पोशिंद्याच्या छाताडावर
हरामींच्या मौजा
तेव्हा राज्य करतात
लुटारूंच्या फौजा
सत्ता आणि दलालांची, कर ताटातूट
अन्
हाण त्याच्या टाळक्यात, पायामधला बूट

माय तुझी बैलावाणी
राबराबून मेली
गल्लीमध्ये मुळं अन्
दिल्लीमध्ये वेली
अभयाने शोध घे, कोणी केली लूट
अन्
हाण त्याच्या टाळक्यात, पायामधला बूट

■■
**गंगाधर मुटे**

# सारे मिळूनी करू भकास

त्या इंग्रजांच्या अनेक गोष्टींचं तुम्ही लोक कौतुक करता ते किती कायद्यानं चालायचे, त्यांच्या काळात बांधकाम किती छान झालं. या उलट काळ्या इंग्रजांच्या काळात कायदे कसे धाब्यावर बसवले जातात. इमारती उद्घाटनापूर्वी कशा कोसळतात अशी आमच्यावर टीका करता. तेही आम्ही मान्य करतो. तो मुद्दा महत्त्वाचा नाही. आम्हाला असं म्हणायचं आहे, तुम्ही त्यांचं कौतुक करता की, त्यांनी पाहा बरं कशी पर्यटन स्थळं विकसित केली. नैनिताल, मसुरी, दार्जिलिंग, काय काय अन् काय काय... अन् आम्ही जेव्हा एक पुण्याजवळ असंच निसर्गरम्य स्थळ विकसित करण्याचा 'हवाहवासा' प्रयत्न केला तर कोण गहजब!

''सुन ले ए ताडमाड, तेरे बीच बड का झाड!''

आम्ही कविता करतो हे वाचून तुम्हाला आश्चर्य वाटत असेल. आम्हालाही वाटलंच. अहो, कविता म्हणजे संस्कृती, काव्य, शास्त्र, विनोद; पण आमचा त्याच्याशी काय बरं संबंध? आमच्यासाठी संस्कृती म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रमात हजेरी लावणे. ही हजेरी का लावायची. मतदारांच्या मध्यमवर्गीयांना खुश करणे आणि आपला असांस्कृतिक चेहरा लपवणे. आम्हाला राजकारण्यांना असले मुखवटे घालावेच लागतात. बरं हे काम तसं फार सोपं आहे. साहित्यिक, कलावंत मंडळी आमच्याकडे आसुसल्या नजरेने पाहत असतात. कुणाला घर पाहिजे असतं, कुणाचं पुस्तक अभ्यासक्रमाला लावायचं असतं. कुणाची वर्णी इथे तिथे लावायची असते, कुणाला काय नि कुणाला काही तरी हवं असतं आणि त्यासाठी आमच्याभोवती नाचणं त्यांना आवश्यक असतं.

मग ते काय करतात, त्यांची वार्षिक जत्रा, उरूस भरतो अखिल भारतीय हे, ते! त्यासाठी त्यांना पैसा पाहिजे असतो. आम्हाला अन् त्यांनाही मिरवायला एक जागा पाहिजे असते. मग काय 'तेरे मेरे बिच में, नही कोई बंधन!' बरं आमच्या बापाचं त्यात काय जातं? पैसा सरकारचा, देणारे आम्ही आणि उधळणारे साहित्यिक कलावंत. तू भी खुश अन् मैभी खुश!

पण या सगळ्या गप्पांत मूळ मद्दा बाजूलाच राहिला. आम्ही कविता का केली? किंवा का पाडली? तशी आमची इच्छा असती तर कुठल्याही दिवाळी अंकात, गुळगुळीत पानावर, डिझाईनवर स्केचमध्ये छापायला संपादक एखाद्या जाहिरातीच्या मोबदल्यात आनंदाने छापायला तयार झाले असते; पण आम्हीच विचार केला, नको... एकदा का आपण कविता 'पाडतो' असा साहित्यिक ठप्पा लागला की, मोबदल्याच्या अपेक्षेने/लोक आपल्याच मागे लागतील आणि आपण आपला देश भकास अन् अपना विकास दीडदमडीचे साहित्यिक होऊन बसू अन् त्यात हळूहळू सगळी कमाई घालवून बसू. म्हणून विचार केला, असलं काही नको. आपलं राजकारणच बरं. ही सांस्कृतिक चळवळ तोंडी लावायला बरी. ते काही आपलं जेवण नव्हे.

हे असं होतं बघा. मुख्य मुद्द्यापासून आम्हाला भटकायची सवय लागलेली आहे. आपणही भटकायचं अन् समोरच्यालाही भटकायला लावायचं. आता हेच पाहा ना, दिल्लीत अर्थतज्ज्ञांच्या बैठकीत आम्ही म्हणालो, की साखरेला भाव देणं परवडणार नाही आणि महाराष्ट्रात कारखान्यात उसाची मोळी टाकताना तिसऱ्याच दिवशी म्हणालो, उत्पादन खर्चावर आधारित भाव नाही मिळाला तर शेतकरी जगणार कसा? बिचाऱ्या शेतकऱ्यांनी टाळ्या वाजवल्या आता त्यात शेतकरी फारच थोडे अन् सारे आमचेच टगे होते. त्यांना शेतकरी हितासाठी काही देणं घेणं नव्हतं. त्यांना पाहिजे होत्या शाळा, कॉलेजे, साखर कारखाने इत्यादी. बरं आमच्या बोलण्यात वरवर तुम्हाला एक विरोधाभास दिसेलही; पण आम्ही काय बोललो ते नीट लक्षात घ्या. आम्ही म्हणालो, उत्पादन खर्चावर आधारित भाव नाही मिळाला तर शेतकरी जगणार कसा आणि एवढं तर खरंच आहे; पण एकाही पत्रकारानं हे नाही विचारलं की, साहेब, शेतकरी जगावा म्हणून तुम्ही काय करणार आहात. खरं तर असं आहे. तो जगला तर आम्ही मरणार अन् आम्हाला जगायचं असेल तर तो पुरता मेलाही नाही पाहिजे; पण जिवंत तर राहिला पाहिजे हे आम्हाला कळतं; पण त्याला नाही कळत अन् त्याला कळत नाही म्हणून आम्ही टिकून आहोत.

हा दोघांसाठी जीवनमरणाचा प्रश्न आहे हे त्याला कोण बरं सांगणार. एक बाबा गेल्या तिसावर वर्षांनी सांगायला लागलाय. ते सारं लोकांना कळतंसुद्धा; पण वळत नाही. कापसाचीच गोष्ट घ्या ना. तुम्ही शेतकऱ्यांनी खूप आरडाओरडा केला तेव्हा आम्ही निर्यातबंदी नसती आणली तर आपल्या घरात आग लागली असती; कारण आमचे दाक्षिणात्य सहकारी आम्हाला सोडून गेले असते आणि त्यांनी आम्हाला सोडलं असतं. सोडलं असतं तर आम्हाला दिल्ली दूर झाली असती अन् मग आमच्या 'लवासा', 'स्पेक्ट्रम', 'कॉमनवेल्थ', 'जनलोकपाल' खायला उठले असते. दुसरीकडे बंदी आणावी तरी शेतकरी उठला नसता; पण ती एक शक्यता होती. आम्हाला पुरता विश्वास आहे की, गेल्या साठावर वर्षांत त्याला आम्ही निरनिराळ्या प्रकारच्या अफुच्या एवढ्या गोळ्यांची सवय लावली आहे की, त्याची इच्छा असूनही तो उठाव करण्याची शक्यता नाहीच म्हणा. तरीही ती शक्यता गृहीत धरून निर्यातबंदी तर आणली; पण त्यात एक मेख मारली. निर्यात टॅक्स एवढा लावला की, कुणीही परकीय मायीचा पूत आपला कापूस खरेदी करणार नाही. याला म्हणतात सर्वोदय. बकरीही खुश अन् वाघही खुश! दिल्ली खुश अन् ही ग्यानबाची मेख

कळेपर्यंत गल्लीही खुश. त्यांना कळेल तोपर्यंत खुप उशीर झालेला असेल.

हे असंच होत राहतं बघा. आम्हाला सांगायचं असतं एक अन् आम्ही सांगत बसतो दुसरचं अन् हे चऱ्हाट असच वळत राहतो आम्ही! म्हणजे आम्ही हे असं जाणूनबुजून करतो असं नाही, तर मुख्य मुद्द्यापासून लोकांचं लक्ष इतरत्र वळलेलं राहावं म्हणून आम्ही ती सवय अंगी बाणवून घेतली आहे आणि आता ती एवढी अंगी भिनली की, मुख्य मुद्दा आम्हीच विसरतो. ती सवय आमच्या अंगी एवढी भिनली आहे की, आम्ही आमचं मूळचं 'घर' ही विसरतो अन् 'मोडनिंब'ला अधूनमधून 'घरोबा' करतो. तर मूळ मुद्दा असा की, आम्ही मुद्दा सोडून भरकटत जातो.

मुद्दा असा आहे की, कविता करायची म्हणून शब्द शोधायचे का नियमात बसवण्यासाठी शब्द शोधायचे. म्हणजे नियम माणसाच्या सोयीसाठी असतात की, माणूस नियमांसाठी असतो. ज्या इंग्रजांनी आमच्यावर दीडशेवर्षे राज्य केलं. त्यांनी नियमांसाठी माणसं नाही वापरली तर माणसासाठी नियम बनवले तोडले. आता इंग्रज गेलेले आहेत. तुमचा तो बाबा भलेही म्हणत असेल की, इंग्रज गेले नाहीत. त्यांनी फक्त रंग बदलला. गोरे इंग्रज गेले अन् काळे इंग्रज आले. म्हणो बापडे! त्यांना विचारतो कोण? आम्हाला पुरता विश्वास आहे. लोक त्याला देव मानतील. त्याची पूजा करतील, फोटो लावतील. त्याचा जयजयकार करतील; पण मत मात्र आम्हालाच देतील. मग आम्हाला त्यांच्याशी काय देणं? तं जाऊ द्या, असं सांगा, त्या इंग्रजांच्या अनेक गोष्टींचं तुम्ही लोक कौतुक करता ते किती कायद्यानं चालायचे, त्यांच्या काळात बांधकाम किती छान झालं. या उलट काळ्या इंग्रजांच्या काळात कायदे कसे धाब्यावर बसवले जातात. इमारती उद्घाटनापूर्वी कशा कोसळतात अशी आमच्यावर टीका करता. तेही आम्ही मान्य करतो. तो मुद्दा महत्त्वाचा नाही. आम्हाला असं म्हणायचं आहे, तुम्ही त्यांचं कौतुक करता की, त्यांनी पाहा बरं कशी पर्यटन स्थळं विकसित केली. नैनिताल, मसुरी, दार्जिलिंग, काय काय अन् काय काय... अन् आम्ही जेव्हा एक पुण्याजवळ असंच निसर्गरम्य स्थळ विकसित करण्याचा 'हवाहवासा' प्रयत्न केला तर कोण गहजब!

काय तर म्हणे, आम्ही पर्यावरणाच्या नियमांचा भंग केला. तुम्ही महाभारताला मानता का? धर्मराज काय म्हणाला होता? मोठं पुण्य कमावण्यासाठी छोटं पाप क्षम्य आहे. मग मोठं निसर्गरम्य पर्यटनस्थळ निर्माण करण्यासाठी पर्यावरणाचा छोटा नाश केला तर काय बिघडलं? शेवटी पर्यावरण जर माणसासाठीच असेल तर माणसासाठीच त्याचा नाश केला तर एवढा ओरडा कशासाठी? काय तर म्हणे? अनेक कायद्यांचा भंग केला. मान्य आहे, नाही म्हणजे कायद्याचा भंग केला हे आम्हाला मान्य नाही; पण समजा मान्य केलं वादाकरता, तर त्यात काय बिघडलं? हे बघा, आम्ही जे काही केलं ते सामान्य माणसासाठी नियम तोडले नाहीत- तुटले; कायदे मोडले नाहीत - मोडल्या गेले आणि त्यातून थोडाबहूत म्हणजे केवळ काही हजार कोटींचा किरकोळ फायदा आम्हाला झाला तर त्यात इतरांचं पोट का दुखावं बरं? बरं, सर्व सामान्यांसाठी एक उत्तम पर्यटनस्थळ निर्माण करता करता त्याच बजेट वाढत जाणं साहजिकच आहे. मग अशा रमणीय स्थळी राहायला येणारी बिचारी, गरीब सामान्य केवळ अब्जोबती कुटुंबं राहायला यायला लागली तर त्यांच्या सुखसोयींसाठी अधिक बांधकाम नको का करायला? त्यामुळे मूळचं 'रिसॉर्ट' हे एक अमेरिकेच्या तोडीचं शहर बनलं. त्यासाठी नियम तुटले, कायदा वाकवला गेला तर वाकू द्या ना. पुण्याजवळ एक काश्मिर उभं राहत आहे ते राहू द्या ना!

तुम्ही हेही म्हणू शकता हे पर्यटन स्थळ आहे का कुबेरनगरी? आम्ही कुठे नाही म्हणतो. आम्हाला सांगा, तुम्ही पर्यटनासाठी निघालात तर धारावीची झोपडपट्टी बघणार की 'कुबेर' नगरी? मग जे तुम्हाला पाहावंसं वाटतं त्यालाच तर पर्यटन स्थळ म्हणतात आणि सर्व सामान्यांना किमान कुबेर लोकांचं जीवनमान कसं असतं, 'त्यांचे राहणे कैसे, बोलणे कैसे?' हे सामान्यांना कळावं याच प्रामाणिक उद्देशानं आम्ही इंग्रजांच्या पावलावर पाऊल ठेवून काही केलं तर पर्यावरणवाद्यांच्या सामाजिक संस्थांच्या पोटात का दुखावं बरं?

नेमकं हेच पृथ्वीबाबांना आम्ही समजावून सांगितलं. त्यामुळे उठल्या उठल्या कोर्टाच्या दट्ट्याखाली काही सत्प्रवृत्त लोकांविरुद्ध कोर्टात फौजतदारी दाखल केली तरी ताबडतोब इटालियन राणीची भेट घेतली. तिला इंग्रजी परंपरा समजावून सांगितली. त्यांचं आपसात काय बोलणं झालं, बाहेर आलं नाही; पण कदाचित काही स्वीस बँकेचा 'उल्लेख' झाला असावा. ते काही असो; पण पृथ्वीबाबा बाहेर हसत हसत आले आणि त्यांनी आमच्या अर्ज पुरवठादारासाठी खुशखबर दिली. तेव्हा 'सुबह का भुला शाम घर लौट आया' म्हणजे सकाळची फौजदारी संध्याकाळी सफाचट व्हायची सोय तर झाली. नाही तरी यातून काही निष्पन्न होणार नव्हतं. नाही तरी आम्हा राजकारण्यांना ही सवयच असते, मी तुमचा बाजार आणतो, तुम्ही आमचं घर सांभाळा. तुमच्या एवढ्या कॉमनवेल्थ गेम्स, स्पेक्ट्रम, आदर्श, जनलोकपाल सांभाळताना आमचं एखादं लवासा नको का सांभाळायला! त्याही पलीकडे दिल्लीत राज्य करायला तर आमच्या कुबड्या नको का? फक्त या कुबड्यांचा तुम्हाला आधार आहे याची जाणीव नेमकी याच वेळेला करून द्यावी लागली एवढंच! आता डायरेक्टली आम्ही स्वतःहून कुणा प्रधानमंत्र्यांच्या दाढीला हात घालणं इष्ट नव्हतं म्हणून आमच्या चाहत्यांमार्फत आम्ही पृथ्वीबाबाला निरोप पोहोचवला, की तुम्हाला आमचा आधार 'हवासा' वाटत असेल तर आमचा 'लवासा' सांभाळा. चाणाक्ष पृथ्वीबाबा वेगीवेगी धावले अन् डायरेक्ट इटालियन राणीशी बोलले. राणीला आमच्या कुबड्यांची महती लक्षात यायला वेळ नाही लागला. आधीच तर त्यांचं गळकं घर पूर्वेकडील ममता पातळ झाल्याने दक्षिण दिशा करुण झाल्यानं कमजोर झालं होतं आणि पडण्याची शक्यता आहे हे तर राणीच्याही लक्षात आलं आणि त्यांना ठाम निर्णय घ्यावा लागला.

आणि अशा तऱ्हेने लोकहो 'सारे मिळूनी करू भकास, एकच ध्यास, एकच श्वासा'ची ही कहाणी अशा तऱ्हेने साठा उत्तरी सफळ झाली!

जाता जाता एक गोष्ट आम्ही अत्यंत नम्रपणाने नमूद करू इच्छितो. तुमचा आमच्यावर नेहमी आरोप असतो की, आम्ही महाराष्ट्राला सर्वच क्षेत्रांत मागे ठेवलेलं आहे. महाराष्ट्राची सर्वत्र पिछेहाटच झालेली आहे. या पार्श्वभूमीवर तुम्हाला आम्ही आमच्या स्वभावात नाही एवढ्या नम्रपणाने सांगू इच्छितो की, निदान दोन क्षेत्रांत तरी आम्ही भारतात सर्व राज्यांत पुढे आहोत. एक तर निवडणुकां मागे निवडणुका लढवताना प्रत्येक निवडणुकांतल्या जाहीर पैसा कमाईत आमचा खिसा आय मीन आमच्या कमाईला इतर खासदार मागे टाकू शकणार नाहीत आणि दुसरी बाब म्हणजे सरत्या २०१० या वर्षात भारतात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्या या आमच्या महान परंपरेत वाढलेल्या महाराष्ट्रात! तब्बल तीन हजार एकशे एक्केचाळीस शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. तेव्हा कुठे गेले पॅकेजेस, असले फुटकळ प्रश्न विचारू नका. आम्ही केलेल्या कर्जमुक्तीच्या ढोलांचे आवाज तुम्ही विसरला नसाल अशी आशा करतो आणि तुमचा बाबू सोंगाड्या मिरचीचं हे खळं उरकतो!

**- बाबू सोंगाड्या**
babu.songadya@gmail.com

■■



## मुन्शी प्रेमचंद

**अनुवादक - अनंत उमरीकर**

भाग अठरा

# गोदान

''तू माझ्याबरोबर चल म्हणजे कमावून दाखवतो. अगं शहराची ओळख व्हायलाच एक वर्ष लागतं.''

''पण आईनं जाऊ दिलं पाहिजे ना?''

''ती का अडविल? कशासाठी?''

''वारे वा! मी तिच्या परवानगी शिवाय नाही येणार तुमच्याबरोबर. तुम्ही तर मला सोडून गेला होता. त्यांनी मला घरात घेतलं नसतं तर मी कुठे गेले असते? जोपर्यंत जिवंत राहीन तोपर्यंत त्यांचे गुण गाईन आणि काय हो, तुम्ही असं किती काळ फिरत राहणार?''

''आणि इथे बसून काय करू? कमवा आणि मरा याशिवाय इथे आहेच काय? थोडीशी अक्कल आणि नेहनतीची तयारी असली तर शहरात माणूस उपाशी तरी मरत नाही. इथे तर डोकंच काम करत नाही. जाऊ दे; पण दादा असे रुसून का बसलेत?''

''आपल्या दुर्भाग्याला अशा तऱ्हेने ते वाट करून देतात. तुम्ही तर त्यांना एवढ्या संकटात टाकलं, की समोर असता तर तुमचं तोंड लाल केलं असतं तुमचं.''

''मग काय, तुला सुद्धा खूप शिव्या दिल्या असतील?''

''कधी नाही. चुकूनसुद्धा नाही. अम्मा निदान आधी तरी रागावलेली होती; पण दादा तर कधीच काही बोलले नाहीत. कधीही हाक मारयची झाली तर मला प्रेमानं बोलावतात. माझं डोकं जराही दुखलं, की ते बेचैन होतात. माझ्या बापासमोर तर मी त्यांना देवासमान मानते. आईला समजावून सांगतात. सुनबाईला काही बोलू नकोस. तुमच्यावर तर शेकडो वेळा रागावले, की मला सोडून तुम्ही कुठे गेलात म्हणून. हल्ली मात्र पैशा पैशाला मोहताज झाले आहेत. ऊसाचे पैसे तर बाहेरच्या बाहेरंच संपले. आता मजूरी करताहेत आणि आज तर काम करता करता बेशुद्ध झाले. खूप रडणं भेकणं झालं आणि तेव्हापासून हे असे पडले आहेत.''

हातपाय धुवून, भांगपट्टी करून गोबर गावातून एक चक्कर मारायला निघाला. दोनही काकाच्या घरात जाऊन रामराम करून आला. मित्रांना भेटला. गावात काही विशेष बदल झाला नव्हता. मात्र पटेश्वरीनं नवीन बैठक बांधली होती. झिंगुरी सिंगनं नवीन आड बांधला होता दारासमोर. गावातली मूलं तर त्याला हिरो समजून त्याच्या बरोबर शहरात जायला तयार झाले होते. एकाच वर्षांत तो कशाचा काय झाला?

अचानक त्याची भेट झिंगुरी सिंगशी झाली. त्यावेळी ते विहिरीवर आंघोळ करत होते. गोबर समोरून गेला; पण बोलला नाही आणि नमस्कारही केला नाही. झिंगुरीनं आपणहूनंच विचारलं, ''केव्हा आलास? मजेत चाललंय? लखनौला कुठे नोकरी करत होतास का?''

गोबर गर्वानं म्हणाला, ''नोकरीसाठी गेलो नव्हतो. नोकरी म्हणजे गुलामगिरी. मी तर व्यापार करत होतो.''

ठाकूरनं त्याच्याकडे पायापासून डोक्यापर्यंत पाहिलं आणि विचारलं, ''रोज किती कमवत होतास?''

त्याला टोचावं म्हणून गोबर म्हणाला, ''अडीच ते तीन रुपये रोज मिळत होते. कधी कधी चार रुपयेही मिळायचे.''

खूप बारिकीनं व्यवहार करूनही ठाकूर झिंगुरी सिंग महिना पंचेवीस तीस पेक्षा जास्त कमवू शकत नव्हता आणि खेड्यातला हा अडाणी महिना शंभर रुपये कमावतो? त्यांची मान आपोआप खाली झाली. आता कुठल्या आधारानं ते याच्यावर रुबाब दाखवू शकतात? जातीनं ठाकूर वर असले तरी आता जातीला विचारतो कोण? तेव्हा त्याच्याशी स्पर्धा न करता गोडी गुलाबीनं काम काढून घ्यावं असा विचार त्यांच्या मनात आला. तेव्हा ते म्हणाले, ''ही कमाई काही कमी नाही रे बेटा. गावात तर तीन आणेही मजूरी मिळत नाही. माझा मुलगा भवनी याला काही काम तिकडे मिळत असेल तर पाहा. तो शिकला सवरला नाही. मी त्याला पाठवून देतो. इथे राहून काही ना काही खोड्या करत राहतो. कुठे मुनीमी करायची झाली तरी चालेल तो तुझा मित्रंच आहे कमी मजूरी मिळाली तरी चालेल. पोटापाण्याची कमाई होऊन वर कमाई होण्याची संधी असली की पुरे!''

मिश्किल हसत गोबर म्हणाला, ''ही वरकमाईची सवयंच माणसाला खराब करते; पण आपल्या लोकांना अशा काही सवयी पडल्यात, की बे-ईमानी केल्याशिवाय आपलं पोटंच भरत नाही. लखनौमध्ये मुनिमकी मिळते; पण सावकार फार बारकाईने चौकशी करतात. मी भवनीला काम मिळवून देतो; पण त्यानं काही हात मारला तर सावकार माझाच गळा धरणार. जगात ज्ञानापेक्षा इमानदारीलाच जास्त महत्व आहे.''

असा टोमणा मारून गोबर पुढे निघाला. ठाकूर मनातल्या मनात शरमला. मनातल्या मनात म्हणाला, ''पोरगा किती गर्विष्ट झालाय? जसा काही धर्माचा अवतारंच आहे.''

गोबरनं दातादीनलाही असेच टोमणे हाणले. ते जेवायला निघाले होते. गोबरला पाहून हसत म्हणाले, ''कसं काय गोबर, मजेत आहेस ना?

तिथे तुला चांगली जागा मिळाली असं समजलं. मातादीनलाही कुठेतरी चिटकवून दे. भांग पिऊन पडून राहण्याशिवाय दुसरं काय काम करतो तो?''

''तुम्हाला काय कमी आहे महाराज? ज्या घराच्या दारात उभे राहता तिथून काही मिळवल्याशिवाय राहतंच नाही. जन्मासाठी घ्या, मरणासाठी घ्या, लग्नात घ्या, मौतीत घ्या. शेती करता, सावकारी करता, दलाली करता कुणाची काही चुकभूल झाली तर दंड ठोकता, त्याचं घरही लुटता. एवढ्या कमाईनं पोट नाही का भरत महाराज? एवढी कमाई करून काय करणार आहात? का सोबत वर न्यायची काही युक्ती शोधली आहे?''

दातादीननं पाहिलं, गोबर केवढ्या धीटपणानं बोलतो आहे. त्याच्या बोलण्यात नम्रता आणि मोठ्या माणसांचा मान ठेवण्याची कल्पनाही जाणवत नव्हती. त्याचा बाप माझी गुलामी करतो आहे हे कदाचित त्याला माहितही नसावं. उथळ पाण्याला खळखळाट फार म्हणतात तसं; पण चेहऱ्यावर मनातल्या भावनांचा लवलेशही न दिसू देता त्याचं बोलणं त्यानं हसण्यावारी नेलं आणि म्हणाले, ''लखनौची हवा खाऊन फारंच चंट झालास. काय कमावून आणलंस त्यातलं काही परत तर कर. तुझी फार आठवण यायची. बरं आणखी काही दिवस राहणार आहेस, की नाहीस?''

''हो, आणखी काही दिवस रहायचं आहेच. मला पंचावर कारवाई करायची आहे. ज्यांनी दंडाच्या नावाखाली दिडशे रुपये वसूल केले आहेत. माझं हुक्कापाणी कोण बंद करतं ते पाहू. मला जातीबाहेर कसं काढतात हेही मला पहायचं आहे.'' अशी धमकी देऊन तो पुढे सरकला. मात्र त्याच्या या उद्धट स्वभावामुळेच तो युवकात लोकप्रिय झाला.

एकजण म्हणाला, ''गोबर भैय्या, करून टाका ना कारवाई, बुढा जहरीला साप आहे. चावला, की ठरलेलंच. तुम्ही चांगलं दरडावलं त्याला. पटवालीला सुद्धा ऐकवा एकदा. फार करामती आहे तो. बापा-मुलात, भावा-भावात तो भांडण लावून देतो. कारिंद्याशी मिली भगत करून आसाम्यांचा गळा कापतो तो. आधी त्याचं शेत नांगरलं, डोंगरल पाहिजे. मग भलेही स्वतःचं नांगरलेलं असो वा नसो. आधी त्याचं शेत भिजवा. मग तुमचं शेत भिजवलेलं असो वा नसो.''

मिशावर ताव देत गोबर म्हणाला, ''मला काय सांगता भाई, वर्षभरात विसरून गेलो, की काय? मला इथे रहायचं नाही. नसता एकेकाला नाचवलं असतं. औंदाची होळी धूमधाम करून गाजवू. निरनिराळी सोंग करून या लोकांनी मजा उडवून देऊ.'' मग काय सर्वांनी मिळून होळीचा कार्यक्रमंच तयार केला. खूप भांग घोटायची. दुधिया भांग आणि नमकीन भांग दोनही प्रकारची भांग रंगाबरोबर काळा रंगही तयार करायचा आणि प्रमुखांच्या चेहऱ्यावर काळा रंग फासायचा. नाही तरी होळीत कोण कुणाला काय बोलणार? पैशाची तर काळजीच नाही. गोबर भैय्या आहेच.

जेवण करून गोबर भोलाला भेटायला निघाला. जोपर्यंत बैलाजी जोडी परत आणणार नाही तोपर्यंत त्याला चैन पडणार नव्हता. तो तर मारामारी करायलाही तयार होता. होरी त्याला थरथरल्या आवाजात म्हणाला, ''भांडण वाढवू नकोस पोरा. भोला जोडी घेऊन गेला. देव त्याचं भलं करो.''

गोबर आवाज चढवून म्हणाला, ''त्याची गय करू नका दादा. त्याची गाय पन्नासची होती, आपली जोडी दीडशेची. तीन वर्षे आम्ही काम घेतलं तरी तिची किंमत दीडशेचं होईल. त्यांच्या पैशाचा त्यांनी दावा लावायचा, डिक्री घ्यायची; पण आपल्या दारातून जोडी का काढली? इकडे जोडी घालवली आणि तिकडे दीडशे रुपये दंड भरला. गाय घरी आणल्याचं हे फळ. माझ्यासमोर जोडी नेली असती म्हणजे दाखवलं असतं. तिघांना इथेच झोपवलं असतं आणि पंचाशी तर बोललोही नसतो. पाहिलं असतं कोण जाती बाहेर टाकतं ते; पण तुम्ही तर केवळ पाहत बसलात दादा.''

होरी अपराधी भावनेनं मान खाली घालून बसला; पण धनियाला त ेपाहवलं नाही. ती म्हणाली, ''तू सुद्धा अन्याय करतो आहेस. अरे हुक्कापाणी बंद केलं असतं तर गावात आपण कसे राहू शकलो असतो? घरात पोरगी बसली आहे लग्नाची तिचं काय झालं असतं? जन्म-मरण प्रसंगी सुद्धा...''

तिचं बोलणं तोडत तो म्हणाला, ''हुक्कापाणी चालू होतं, बिरादरीत मान सन्मान होता तर माझं लग्नं का नाही झालं? का? सांग ना! यासाठी, की घरात खायला भाकर नाही म्हणून. रुपये पैसे असले तर हुक्कापाणी चालू राहतं. बिरादरीचा तर प्रश्नंच नाही. दुनिया पैशावर चालते, हुक्कापाण्यावर नाही!''

बाळ रडायला लागलं म्हणून धनिया घरात गेली आणि गोबर बाहेर जाऊ लागला. होरी बसून विचार करायला लागला. पोरगा जास्त शहाणा झालाय कसा ताडताड बोलतो आहे. त्याच्या वाकड्या बोलण्यानं होरीच्या नीती, धर्माच्या कल्पनांना तडा गेला. अचानक होरी म्हणाला, ''मी येऊ का रे सोबत?''

''दादा, भीऊ नका, मी भांडायला चाललो नाही. माझ्यासोबत तर कायदा आहे, मला भांडणाची काय गरज?''

''पण मी आलो तर काही हरकत आहे का?''

''हो आहे. मोठी हरकत आहे. तुम्ही सारा खेळ बिघडून टाकाल.'' तेव्हा होरी गप्प बसला आणि गोबर चालला गेला.

पाच मिनीट झाली असतील नसतील तोच धनिया बाळाला घेऊन बाहेर आली आणि तिनं होरीला विचारलं, ''गोबर गेला का? आणि एकटाच? देव तुम्हाला काही बुद्धी देणार आहे का? भोला सहज जोडी देईल असं वाटतं का? तीघेही त्याच्यावर तुटून पडतील. देवंच त्याचं रक्षण करो. तुमच्यापुढे तर मी हात टेकले. आता कुणाला सांगू त्याच्या मागे जायला?''

कोपऱ्यातली लाठी घेऊन होरी गोबरच्या मागे निघाला. गावाबाहेर येऊन त्यानं इकडे तिकडे पाहिलं. दूर कुणीतरी जाताना त्याला दिसलं; पण त्याला प्रश्न पडला, एवढ्या थोड्या वेळात गोबर एवढ्या दूर जाईल कसा? होरीला त्याचं अंतर्मन छेडायला लागलं. आपण गोबरला तेव्हाच का नाही थांबवलं? आपण जर दरडावून त्याला मना केलं असतं तर तो भोलाच्या घरी गेलाच नसता आणि आता तर आपल्याला पळताही येत नाही. थकून तो तिथेच सला आणि म्हणाला, ''देवा त्याची रक्षा कर!''

गोबर त्या गावी गेला तेव्हा वडाच्या एका विशाल झाडाखाली त्याला काही लोक जुगार खेळताना दिसले. त्यांना वाटलं हा कुणी पोलिसांचा माणूस असावा म्हणून हातातल्या कवड्या खाली टाकून ते पळायला लागले; पण अचानक त्यांच्यापैकी एका जंगीनं त्याला ओळखलं आणि तो म्हणाला, ''अरे हा तर गोवर्धन आहे!'' तेव्हा गोबरनं पाहिलं तर तो जंगी झाडाआडून पाहत होता. तेव्हा गोबर म्हणाला, ''अरे भिऊ नका जंगी भैय्या, मी गोवर्धनंच आहे. आजंच आलो आहे. वाटलं सर्वांना भेटावं. काय माहित पुन्हा केव्हा यायला मिळेल. तुम्हा लोकांच्या आशीर्वादानं मी तर भैय्या मजेत निघून गेलो. मी ज्याच्याकडे चाकरी करतो आहे ते म्हणाले, की मिळाले तर एकदोन माणसं घेऊन या. चौकीदारीसाठी त्यांना माणसं पाहिजे आहेत. मी त्यांना म्हणालो, अशी माणसं आहेत, की जीव गेला तरी जागा सोडणार नाहीत. तुमची इच्छा असेल तर माझ्यासोबत चला. चांगलं ठिकाण आहे.''

त्याचा थाटमाट पाहून जंगी त्याच्या चपेटमध्ये

आला. जंगीला तर कधी चामड्याचे वहाणही पहायला मिळाले नाहीत आणि इथे हा तर चमचम करणारे बूट घालतो आहे. अंगात स्वच्छ इस्त्री केलेला सदरा, भांग पट्टी केलेली बिलकुल साहेबासारखा दिसणारा! पूर्वीचा फाटका आणि आताचा बदललेला गोबर यांच्यात खूपंच फरक होता. जंगीच्या चेहऱ्यावरचा हिंसक भाव बराच कमी झाला होता आणि उरला सुरला आता कमी झाला. जंगीला जुगारीचा नाद होताच आणि आता गांजाची लत लागलेली. घरातून पैसे मिळणं कठीण होतं आणि इथे तर माशा मारतो आहे. त्यानं विचारलं, ''किती रुपये मिळतील?''

यावर गोबर म्हणाला, ''त्याची काळजी करू नका. आपल्याच हातात सगळं काही आहे. जे पाहिजे ते मिळेल. मी विचार केला, आपल्या घरातंच माणसं आहेत. बाहेरचा घ्यायचा कशाला?''

जंगीनं उत्सूकतेनं विचारलं, ''काय काम करावं लागेल?''

''चौकीदारी करा नाही तर वसुलीचं कामं करा. वसुली सर्वांत छान. आसामीकडून घ्यायचे आणि मालकाला येऊन सांगायचं, आसामी भेटला नाही. चार आठ आणे रोज वरकड कमाई होऊ शकते.''

''जागेला काय कमी? पूर्ण हॉल रिकामा आहे. पाणी, नळ, वीज कशाची काही कमी नाही. बरं, पिताजी घरी आहेत, की कुठं गेलेत?''

''दूध घेऊन बाजारात गेलेत. मला कुणी बाजारात जाऊ देत नाही. तू गांजा पितोस असं म्हणतात. मी तर गांजा खूप कमी केलंय आता; पण दोन पैसे तरी रोजचे पाहिजेत का नाही? पण तुम्ही कामताजीला काही सांगू नका. मी तुमच्याबरोबर येतो तुमच्या गावी.''

''हो, हो. बिलकुल चला. होळीच्यानंतर!''

''पक्क?''

दोघेहीजण गप्पा मारत भोलाच्या घरापर्यंत आले. भोला सूत कातत होते. गोबरनं त्यांना नमस्कार केला आणि भरल्या गळ्याने म्हणाला, ''काका, माझ्याकडून जी काही चूक झाली तिच्याबद्दल माफ करा.''

सूत कातणं बंद करून शुष्क आवाजात भोला म्हणाला, ''तू तर असं पाप केलं होतंस, की त्यापुढे तुझं डोकं कापणही पाप होणार नाही; पण आता आमच्या दारात आलास आता काय म्हणू? जा, जे माझ्याबरोबर केलंस त्याची शिक्षा देव देईल तुला. जा; पण केव्हा आलास?''

गोवर्धननं खूप मीठ मिरची लावून आपली परिस्थिती वर्णन केली आणि जंगीला सोबत नेण्याची परवानगी मागितली. भोलाला तर न मागता वरदान मिळालं. जंगी घरात काही ना काही अडचण निर्माण करायचा. बाहेर गेला तर निदान चार पैसे कमविल. घरी नाही दिले तरी चालेल. आपलं ओझं आपल्याच डोक्यावर तरी राहील.

''नाही काका.'' गोबर म्हणाला, ''वर्षा दोन वर्षांत तो चांगला माणूसही बनेल देवाच्या कृपेनं आणि यानं मनावर घेतलं तर.''

''हो, पण यानं मनावर घेतलं पाहिजे ना!''

''अहो, अंगावर पडलं, की माणूस आपोआप सरळ होतं.''

''मग कधी जायचा विचार आहे?''

''होळीच्या नंतर जाईन. इथल्या शेतीवाडीचं काम मार्गी लावून देतो म्हणजे मी निश्चित होईल!''

''होरीला सांगा आता बसून रामराम करा म्हणावं.''

''सांगतो तर खूप पण ऐकतील तर की!''

''तिथे शहरात कुणा वैद्याची ओळख आहे का? खोकल्याचा फारंच त्रास होतो. अंमळ औषध तरी पाठवून दे.''

''माझ्या शेजारीच एक चांगले वैद्य राहतात. त्यांच्याकडून औषध घेऊन पाठवीन. खोकला रात्री त्रास देतो का दिवसा?''

''दिवसा नाही, रात्रीच त्रास देतो. रात्री डोळा लागत नाही. तिथे काही जागा असेल तर मीही येतो. इथे पडतळ खात नाही.''

''काका, रोजंदारीची जी मजा तिथे आहे, ती इथे काय आहे? इथे रुपयाला दहा शेर दूध कुणी विचारत नाही. हलवायाच्या गळ्यात मारावं लागतं. तिथि पाच सहा शेर या भावात दूध विकतं. वाटलं तर एका फक्यात मणमण दूध विका!''

जंगी गोबरसाठी दुधिया शरबत करायला गेला होता. भोलानं एकांत पाहून विचारलं, ''या कटकटीतून आता निघावसं वाटतंय. जंगीची अवस्था तू तर पाहतो आहेसंच. कामता दूध घेऊन जातो, वैरण पाणी मी करतो. आता तर असं वाटतं, की एक रोटी खावं आणि कुठेतरी घेऊन पडून रहावं. किती दिवस कष्ट करायचे? रोज रोज भांडण, कटकटी. किती जणांचे पाय धरू? खोकला येतो तर रात्री उठवतही नाही; पण कुणी पाणी द्यायला सुद्धा येत नाही. बाज तुटली आहे, कुणी पहायला तयार नाही. मी नीट केली तरंच नीट होणार!''

गोबर आत्मीयतेनं म्हणाला, ''कामा, तुम्ही लखनौला चलाच. पाच शेर दूध विकायचं नगदीत. अनेक मोठमोठ्या माणसांची माझी ओळख आहे. मणभर दूध विकायचा जिम्मा मी घेतो. माझंच चहाचं दुकान आहे. दहा शेर दूध तर रोज मलाच लागतं. तुम्हाला काही त्रास होणार नाही.''

काही क्षणानंतर भोला म्हणाला, ''बेटा रागा रागानं माणूस आंधळा होतो. मी तुमच्या दावणीतून जोडी सोडून आणली होती. ती परत घेऊन जा. नाही तरी आमच्या घरी कुठे शेती आहे?''

''मी तर एक नवी जोडी घ्यायचं ठरवलंय काका?''

''अरे नवीन जोडी काय करणार आहेस? हीच घेऊन जा.''

''मग मी तुमचे पैसे पाठवून देतो.''

''रुपये कुठे बाहेर आहेत? आपल्याच घरात आहेत. तुमच्या आमच्यात काय वेगळेपण आहे रे? खरं तर मला आनंदंच वाटतो, की झुनिया चांगल्या घरात आहे. आरामात आहे आणि मी तिच्या जीवावर उठलो होतो.''

संध्याकाळी गोबर परतला तेव्हा बैल जोडी त्याच्यासोबत होती आणि त्याच्या मागे मागे दह्याच्या दोन हंड्या घेऊन जंगीही येत होता.

खेड्यात वर्षांतून सहा महिने काही ना काही उत्सवाच्या निमित्तानं ढोल झांझ वाजवणं चालूच असतं. होळीच्या एक महिना आधीपासून पुढेपर्यंत होळीचा उत्सव चालूच असतो. आषाढात एक सण 'आल्हा' आणि श्रावण भाद्रपदात 'कजालिया' त्यापुढे रामायण-महाभारत चालू होतं. सावकाराच्या धमक्या आणि कारंद्याच्या शिव्या याचाही या उत्सवावर काही परिणाम होत नाही. घरात धान्य नसू दे, अंगावर वस्त्र नसू दे, कंबरेला पैसा नसू दे, त्याचा काहीही परिणाम या उत्सवावर होत नाही. जीवनातला आनंद उपभोगण्याची वृत्ती तर दाबून ठेवता येत नाही. हसल्या शिवाय, आनंद उपभोगल्या शिवाय जीवनाचा गाडा कसा काय पुढे सरकारणा?

तसं पाहिलं तर होळीच्या गाण्या बजावण्याचं मुख्य ठिकाण नोखेरामचा चौपाळंच असायचा. तिथेच भांग घोटायचे, रंग उडायचे आणि नाचगाणही व्हायचं! या उत्सवात कारिंद्याचे दहा पाच रुपयेही खर्च व्हायचे. नाही तरी आपल्या दारापुढे उत्सव साजरा करायचं सामर्थ्य होतं तरी कुणात?

पण यावेळी सारे युवक गोबरच्या घरासमोर जमा झाले आणि नोखेरामचा चौपाळ ओका ओका झाला. गोबरच्या दारात भांग घोटल्या जात होता, विडे तयार होत होते. गाणं बजावणंही चाललं होतं. नोखेरामचा चौपाळ सुना सुना पडला होता. भांग आणलेली होती; पण घोटायला होतं कोण? ढोल झांझा होत्या; पण गायला होतं कोण? ज्याला पाहवं तो गोबरच्या घराकडे धावतो आहे. त्याच्या घरी भांगेत, गुलाब पाणी, केसर आणि बदाम

# शेतकरी संघटना अमरावती विभागीय कापूस परिषद

## कर्जमुक्तीचा लढा तीव्र करणार


**अमरावती :** उत्पादन खर्च सतत वाढत चाललेला असून, त्या तुलनेने शेतमालास कवडीमोल भाव दिला जात आहे. शेतकऱ्यांची स्थिती दिवसेंदिवस दयनीय होत असल्याने कर्जमुक्तीचा लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार मंगळवारी (ता. एक) पार पडलेल्या विभागीय कापूस परिषदेत व्यक्त करण्यात आला.



स्थानिक धर्मदाय कॉटन फंडच्या सभागृहात शेतकरी संघटना तसेच स्वतंत्र भारत पक्षातर्फे ही परिषद आयोजिण्यात आली होती. परिषदेला माजी आमदार ॲड. वामनराव चटप, सरोज काशीकर, शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रवी देवांग, शैलजा देशपांडे, ॲड. दिनेश शर्मा, विदर्भ अध्यक्ष जगदीशनाना बोंडे, जिल्हाप्रमुख विजय विल्हेकर, दिलीप भोयर यांसह विभागातून मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

कापसाला प्रतिक्विंटल सहा हजार रुपये आधारभूत किंमत देण्यात येऊन निर्यातबंदी कायमची हटविण्यात यावी, अशी मागणी माजी आमदार ॲड. वामनराव चटप यांनी केली. शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रवी देवांग यांनी सांगितले, जोपर्यंत शासन शेतमालाचे भाव पाडण्याचे काम करेल, तोपर्यंत आमचा संघर्ष सुरूच राहील. आमच्या बाजारपेठेचे स्वातंत्र्य आम्हाला मिळू दिले पाहिजे. सरकारने त्यात हस्तक्षेप करू नये, असा इशारासुद्धा दिला. दरम्यान सरोज काशीकर, जगदीश बोंडे, विजय विल्हेकर आदींनीसुद्धा मनोगत व्यक्त केले. या परिषदेला सुरेश जोगळे, राजेंद्र ठाकरे, देवीदास कणखर, ज्ञानेश्वर गादे, देवेंद्र राऊत, दिलीप भोयर, श्रीकांत पाटील यांसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दशरथ शेवकरी यांना श्रद्धांजली



**चाकण :** शेतकरी संघटनेच्या संस्थापक शिलेदारांपैकी दशरथ गेजभाऊ शेवकरी (चाकण) यांचे ५ नोव्हेंबर २०११ रोजी त्यांच्या राहत्या घरी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःख निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय अवघे ५५ वर्षांचे होते. गेली सात-आठ वर्षे ते मधुमेहाच्या व्याधीने त्रस्त होते. मार्च १९८० मध्ये झालेल्या चाकण येथील कांदा आंदोलनात त्यांना तुरुंगवास पत्करावा लागला होता. सहवीपर्यंत जेमतेम शिक्षण झालेले दशरथ शेवकरी शरद जोशींनी भाषणात काय काय सांगितले ते कित्येक दिवस खडान्खडा म्हणून दाखवीत. त्यांच्या मनमिळावू स्वभावामुळे अनेक नेत्यांबरोबर त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. दि. ८ नोव्हेंबर रोजी चाकण येथे झालेल्या शोकसभेत ॲड. पांडुरंग केदारी यांनी शेतकरी संघटनेच्या वतीने दशरथ शेवकरी यांना श्रद्धांजली वाहिली व त्यांच्या दुःखी कुटुंबियांप्रती सहवेदना व्यक्त केली.

---

आहेत. शेरभर बदाम तर स्वतः गोबरनंच आणले होते. भांग पिल्याबरोबर डोळे तर्र होतात. खास बनवलेली तंबाखूही आणली होती. रंगही मस्त भरून ठेवलेला. पैसे कमावणंही कळतं गोबरला आणि खर्च करणंही. नाही तर पैसा कमावून पुरून ठेवला तर कुणाला कळणार आहे? खर्च करणं हीच तर खरी पैशाची शोभा आहे आणि फक्त भांगे पुरता कार्यक्रम आहे असं नाही तर सर्व गाणाऱ्यांनाही आवतन होतं आणि गावात नाचणारे कमी होते ना गाणारे! न नाटक करणारे! शोभ स्वतः लंगड्याची आणि कुणाच्याही बोलण्याची जशी नक्कल करतो त्याला तर तोड नाही. ज्याची म्हणाल त्याची नक्कल करून दाखवतो. माणसाची आणि जनावराचीही. तसंच गिरिधर सुद्धा उत्तम नकल्या आहे. वकील, पटवारी, ठाणेदार, चपराशी, शेटजी साऱ्यांची नक्कल करायचा तो; पण त्याच्याजवळ नकलासाठी आवश्यक ते सामान नव्हतं. मात्र यावेळेस गोबरनं ते सामानही आणलं होतं. म्हणून त्याच्या नकला आता पाहण्यासारख्या होणार होत्या.

या साऱ्यांची गावात एवढी चर्चा झाली, की सायंकाळपासूनंच गावोगावचे लोक यायला सुरुवात झाली होती, जवळपासच्या गावाहून टोळ्या टोळ्यांनी. दहा वाजेपर्यंत तर तीन चार हजार माणसं जमा झाले होते आणि गिरीधर प्रत्यक्षात झिंगुरीचं रूप घेऊन उभा राहिला. तेव्हा तर उभं रहायलाही जागा नव्हती. तसंच टकलू डोकं, मोठ मोठ्या मिशा, तशीच ढेरी, बसून जेवण करायला लागला आणि मोठी ठाकुरीण त्याला पंख्यात वारा घालत होती. तिच्याकडे रसिकतेनं पाहत ठाकूर म्हणाला, ''अगं, आजही तू अशी जवान दिसतेस, की कुणीही तरुण तुझ्यासाठी जीव टाकील.''

यावर ठाकुरीण रुसून म्हणते, ''म्हणून तर आणखी एक तरुण बायको आणली वाटतं!''

''अगं, तिला आणलंय ते तुझ्या सेवेसाठी. ती काय तुझी बरोबरी करणार?'' लहानी बायको हे ऐकते आणि रागारागानं घरात जाते.

दुसरं दृष्य. ठाकूर बाजेवर पहुडला आहे आणि छोटी मालकिण तोंड फिरवून बसली आहे. ठाकूर वारंवार तिचं तोंड आपल्याकडे वळवतो आणि म्हणतो, ''लाडके, माझ्यावर का रागावलीस?''

''तुमची लाडकी जिथे आहे तिथेच जा. मी तर नोकराणी आहे ना. दुसऱ्यांची सेवा करणारी!''

''तू तर माझी राणी आहेस. तुझी सेवा करायला तर ती म्हातारी आहे.'' पहिली बायको ते ऐकते आणि झाडू घेऊन येते आणि त्याला झाडूनं झोडपते. तेव्हा ठाकूर पळून जातात.

**क्रमशः**

- **अनंत उमरीकर** नानल पेठ, परभणी -४३१४०१. मो. ९८९०३९६६५७

■■

# 'वैद्यनाथ' साखर कारखान्याची मोळी अडवली, मुंडे गेले माघारी



**पैठण :** वैद्यनाथ संत एकनाथ सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाच्या शुभारंभाच्या दिवशी शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष कैलास तवार व कार्यकर्त्यांनी मोळी अडवली. गळीत हंगामाच्या शुभारंभाच्या कार्यक्रमासाठी खा. गोपीनाथ मुंडे गव्हाणीजवळ गेल्यानंतर त्यांना अगोदर भाव जाहीर करा आणि नंतरच मोळी टाका, असा आग्रह शेतकरी संघटनेने धरला. मुंडे पेचात पडल्यामुळे त्यांनी असे असेल तर मी माघारी जातो असे म्हणून ते मागे फिरले. तरीही संघटनेच्या कार्यकर्त्यांनी त्यांना अगोदर भाव जाहीर करा. तरच इथून जाता येईल, असे सांगितले. शेवटी त्यांनी सरकार जो भाव ठरविल, तो आम्ही निश्चित देऊ असे सांगून वेळ मारून नेली. मात्र या आंदोलनामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये मोठी चलबिचल झाली व उसाचा भाव हा अगोदरच ठरला पाहिजे, अशी भावना त्यांनी संघटनेकडे व्यक्त केली. तसेच, आंदोलनाचा मार्गही अवलंबवावा लागेल असेही ठरविण्यात आले.

हा कारखाना वेगवेगळ्या पक्षांच्या काँग्रेस, शिवसेना यांनी चालवून बघितला; परंतु तो काही फारसा तोटा कमी करू शकला नाही. सध्या गोपीनाथ मुंडे हा कारखाना चालवित आहेत. एकीकडे ऊसतोड मजुरांसाठी मुंडे-पवार लवादाची नेमणूक केली जाते. तशी शेतकऱ्यांच्या उसाचे गाळप सुरू होण्याअगोदर भाव ठरविण्यासाठी काहीच का केले जात नाही? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. आपल्या भाषणामध्ये शेतकरी संघटना कारखाना चालविण्यास तयार आहे का? असा प्रश्न मुंडेंनी विचारला. त्यावेळी मराठवाडा अध्यक्ष कैलास तवार यांनी उभे राहून कारखाना चालविण्यास तयार असल्याचे सांगितले. शेतकरी आपल्यालाच कारखाना चालवा, बंद पडू देऊ नका, असा आग्रह धरतील असा मुंडेंचा कयास होता; परंतु शेतकऱ्यांनी यावेळी काहीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. शेवटी मुंडेंना आपले भाषण कसेबसे पुढे रेटावे लागले. या कार्यक्रमामध्ये खासदार रावसाहेब दानवे हेही उपस्थित होते. त्यांच्याही ताब्यात एक कारखाना आहे. त्यांनी यावेळी भाषण करताना उसाच्या भावाचा मुद्दा टाळून इतरच विषयांवर गमतीजमतीचे भाषण केले. खासदार चंद्रकांत खैरे उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात त्यांच्याकडे कुठलाही कारखाना नसल्यामुळे शेतकऱ्यांना भाव मिळालाच पाहिजे असा आग्रह धरला. या वेळी एकाच पक्षाच्या वेगवेगळ्या भूमिकाही स्पष्ट झाल्या. सभासदांच्या मनात मात्र यावेळी भाव जाहीर व्हावा, अशी प्रबळ इच्छा होती. मात्र तसे झाले नाही. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.



## जालना येथे चक्काजाम आंदोलन

**जालना:** कापसाला ६००० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळावा यासाठी दिनांक ११ नोव्हेंबर रोजी शेतकरी संघटनेने चक्काजाम आंदोलन पुकारले होते. जालना-मंठा रोडवरील विरेगाव येथे सुमारे दोन तास झालेल्या चक्का जाम आंदोलनात मार्गदर्शन करताना स्वतंत्र भारत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. आप्पासाहेब कदम यांनी हमीभाव मिळालाच पाहिजे, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल अशा इशारा दिला. यावेळी लक्ष्मण मोहिते, गजाजन पाटील भांडवले (जिल्हाध्यक्ष शेतकरी संघटना युवा आघाडी, जालना) आणि असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.




# औरंगाबाद येथे रास्ता रोको आंदोलन

**औरंगाबाद :** कापसाला ६ हजार रुपये आणि उसाला २१०० रुपये हमीभाव देण्याच्या मागणीसाठी शेतकरी संघटनेने केलेल्या रास्ता रोकोमुळे जालना रोडवरील वाहतूक सुमारे तासभर ठप्प झाली. या आंदोलनादरम्यान कोणीही हिसंक घटना घडली नाही. शेतकरी संघटनेने कापूस आणि उसाला हमीभाव मिळावा यासाठी आंदोलन पुकारले. औरंगाबाद-जालना मार्गावरील सुंदरवाडी पेट्रोल पंपाजवळ शेतकरी संघटनेच्या वतीने रास्ता रोको करण्यात आला. औरंगाबाद ते जालना हा मार्ग प्रचंड वर्दळीचा आहे. रास्ता रोकोमुळे या मार्गावरची दोन्ही दिशांनी येणारी वाहने थांबली. जवळपास एक तास या मार्गावर दुतर्फा वाहने थांबली होती. आंदोलनस्थळी पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला होता.

आंदोलकांसमोर बोलताना शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष कैलास तवार म्हणाले की, कापसाला ६ हजार रुपये आणि उसाला २०५० रुपये हमीभाव द्यावा अशी आमची प्रमुख मागणी आहे. श्रीकांत उमरीकर म्हणाले की, सरकारने सिंचनाबरोबरच वीजपुरवठा नियमित करावा यासाठी प्राथमिक स्वरूपाचे आंदोलन सुरू झाले आहे. मागण्या मान्य झालया नाही तर शेतकरी संघटना तीव्र आंदोलन करील. शेतकरी संघटनेच्या माजी महिला आघाडी अध्यक्षा जयश्री पाटील म्हणाल्या की, राज्यकर्ते शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेत नसल्याने रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागत आहे. सरकारी धोरणामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण सुरू आहे. याविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

# येवल्यात मोहन गुंजाळ स्मृतिग्रंथाचे प्रकाशन




**येवला : दि. १० नोव्हेंबर -** शेतीशी संबंधित अनेक प्रश्न आहेत. ऊसतोडणी मजुरांचा प्रश्न सोडविला गेला. तथापि आज ऊस उत्पादकांचा प्रश्न धगधगत आहे. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्त झाल्याचे मला पाहायचे आहे. त्याशिवाय मी डोळे मिटणार नाही असे भावपूर्ण उद्गार शरद जोशी यांनी काढले. ते येवला, जि. नाशिक येथे मोहन गुंजाळ स्मृतिग्रंथ प्रकाशन सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

थोर सामाजिक कार्यकर्ते व शेतकरी संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष, ज्येष्ठ नेते व विचारवंत मोहन गुंजाळ यांच्या जीवनावरील 'महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळी, तत्त्व व्यवहार व आव्हाने-मोहन गुंजाळ स्मृतिग्रंथ' या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन १० नोव्हेंबर शेतकरी हुतात्मा दिनी येवल्यात शरद जोशी यांच्या हस्ते झाले.

स्मृतिग्रंथाचे संपादन प्रा. गो. तु. पाटील आणि रणजीत परदेशी यांनी केले आहे. परिवर्तनवादी चळवळींची संकल्पना घेऊन या ग्रंथात महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळींचा परामर्श घेण्यात आला असून, मुलाखतींच्या माध्यमातून कार्यकर्ता घडण व विकसनाचा आलेख मांडलेला आहे. मोहन गुंजाळांवरील व्यक्तीपर लेख, आठवणी, छायाचित्रे व चळवळीतील योगदान या विभागांतून मोहन गुंजाळांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. जनशक्ती वाचक चळवळीने प्रकाशित केलेला हा ग्रंथ ३२० पानांचा असून ग्रंथाचे स्वरूप केवळ स्मृतीग्रंथाचे नाही. कार्यकर्त्यांसाठी व अभ्यासकांसाठी हा ग्रंथ संदर्भग्रंथ झाल्याचेही शरद जोशी यांनी भाषणातून नमूद केले. अशा मौलिक संपादनाबद्दल त्यांनी संपादकांना धन्यवाद दिले.

समारंभात संपादक प्रा.गो. तु. पाटील यांनी प्रस्ताविक करून स्मृतीग्रंथाची पार्श्वभूमी विशद केली. रणजित परदेशी ग्रंथाच्या अंतरंगासंबंधी बोलले. श्रीमती निर्मला गुंजाळ यांनी मांडलेल्या मनोगतास त्यांच्या कुटुंबियांच्या पाठिशी संघटना असल्याची ग्वाही शरद जोशींनी दिली. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. शेषराव मोहिते यांनी हा स्मृतीग्रंथ प्रकाशित होणे शेतकरी संघटनेच्या दृष्टीने मोठी उपलब्धी असल्याचे सांगितले. आभार बापुराव पगारे यांनी मानले. प्रारंभी संतु पाटील झांबरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सूत्रसंचालन श्रीकांत उमरीकर यांनी केले.

समारंभात येवले शहर व तालुक्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, शेतकरी, परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते तसेच शेतकरी संघटना नेते, भास्करराव बोरावके, गिरधर पाटील, सुरेशचंद्रजी म्हात्रे, रवि देवांग, बद्रीभाऊ देवकर व अन्य नेते उपस्थित होते.

# शेतकरी संघटना नांदेड विभागीय कापूस परिषद वृत्तांत



**१) नांदेड विभागीय कापूस परिषदेचे उद्‌घाटन करताना मान्यवर, २) मार्गदर्शन करताना मा. शरद जोशी ३) उपस्थित प्रचंड जनसमुदाय ४) परिषदेच्या निमित्ताने उभारण्यात आलेल्या विविध स्टॉल्सना भेटी देताना मा. शरद जोशी आणि इतर...**

**नांदेड :** प्रगत युगात रोज नवे शेती तंत्रज्ञान येत आहे. या तंत्राला होणा विरोध झुगारून ते आत्मसात केले तर शेतकरी आर्थिक सुबत्ता मिळाल्याशिवाय राहणार नाही. शिवाय याच तंत्रामुळे शेतकरी कर्जमुक्त राहील असा विश्वास शेतकरी संघटनेचे संस्थापक शरद जोशी यांनी येथे व्यक्त केला.

शहरातील नवा मोंढा बाजार समितीच्या मैदानात आज शनिवारी शेतकरी संघटनेची विभागीय कापूस परिषद घेण्यात आली. या परिषदेचे उद्‌घाटन केल्यानंतर प्रथम सत्राच्या समारोपाप्रसंगी श्री. शरद जोशी बोलत होते. श्री. जोशी पुढे म्हणाले, बी.टी. तंत्रज्ञानाची संकल्पना आजची, ४०० वर्षांपूर्वी देखील कास्तकरांच्या मनात घर करून होती. शेतीमधून निघणारे उत्पादन अधिकाधिक कसे वाढविता येईल यासाठी तेव्हादेखील प्रयत्न सुरू होते. नव्या तंत्रज्ञानाच्या आधारावरच सर्वार्थाने समाधान मिळेल असा विचार त्यावेळी देखील अनेकांच्या मनात घर करून बसला होता. आता त्याला मूर्त स्वरूप मिळू लागले आहे. शेतकऱ्यांनी नवे तंत्रज्ञान स्वीकारतानाच एकाधिकार खरेदी बंद करण्यासाठी देखील पुढे येणे काळाची गरज बनली आहे.

जैविक तंत्रज्ञानामुळे अवर्षणग्रस्त भागातदेखील पिक घेता येऊ लागली आहेत. कमी सकस जमिनीतून वाढीव स्वरूपाचे उत्पादन मिळू लागले आहे. आता एकदा इथेनॉल तयार करण्यासाठी व त्याचे भाव ठरविण्याची परवानगी मिळाली की, शेतकऱ्यांच्या टोलेजंग इमारती उभ्या ठाकल्याशिवाय राहणार नाहीत, असा विश्वासही जोशी यांनी व्यक्त केला.

तत्पूर्वी शेतकरी संघटनेचे नेते तथा परिषदेचे संयोजक गुणवंत पाटील हंगरगेकर यांनी प्रास्ताविक केले. ऊस, कापूस, कांदा यांसह शेती उत्पादनांप्रती राज्य आणि केंद्र शासनाचे धोरण कसे उदासिन आहे. त्यातून कोणता मार्ग स्वीकारला म्हणजे शेतीमालाला भाव मिळेल. यावर सविस्तर चर्चा व्हावी, शेतकऱ्यांमध्ये प्रबोधन व्हावे म्हणूनच या परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे हंगरगेकर यांनी यावेळी सांगितले.

परिषदेच्या प्रथम सत्रात सौ. जयश्री पाटील, रवि देवांग, गोविंद जोशी, दिनेश शर्मा, कैलास तवार यांचीही भाषणे झाली. प्रथम सत्राचे सूत्रसंचालन संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष ॲड. धोंडीबा पवार यांनी केले.

# भाऊराव कारखाना परिसरातील ऊसतोडणीचे काम बंद पाडले

**नांदेड :** शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आज भाऊराव पाटील कारखान्याच्या चेअरमनला शनिवारपर्यंतची डेडलाईन दिली आणि या कारखाना परिसरात असलेल्या ऊसतोडणीचे काम बंद पाडले. हे ऊसतोडणीचे काम सुरू केले तर कोयता हातात घेऊ, अशी भूमिका घेतलेली शेतकरी संघटना पुढे कोणते पाऊल उचलते, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

शेतकरी संघटनेचे गुणवंत पाटील हंगरगेकर यांच्या नेतृत्वाखाली आज भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन गणपतराव तिडके यांना शेतकऱ्यांना उसाचा पहिला हप्ता २१०० रुपये मिळावा, अशी मागणी केली आहे. शासनाने दिलेला १४५० रुपये या भावाने शेतकऱ्यांचा एकूण खर्चदेखील निघणार नाही. अशी भूमिका त्यांनी मांडली.



**शनिवारची डेडलाईन : गुणवंत पाटील हंगरगेकर**

भाऊराव साखर कारखान्याने परिसरात असलेल्या ऊस उत्पादकांना शनिवारपर्यंत २१०० रुपये याप्रमाणे पहिल्या हप्त्याचा भाव जाहीर करावा. शनिवारपर्यंत याबाबतचा निर्णय कारखाना प्रशासनाने नाही घेतला तर मग शेतकरी संघटना याला आपल्या पद्धतीने उत्तर देईल. गेल्या अनेक दिवसांपासून एकाधिकारशाहीच्या थाटात ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर होत असलेला या काळातील अन्याय आता सहन केला जाणार नाही. मुकाट्याने शेतकऱ्यांना किमान चार पैसे मिळतील. या तुलनेचा भाव जाहीर करा, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकरी संघटनेचे गुणवंत पाटील हंगरगेकर यांनी दिली.

# साखरसम्राटांच्या पुतळ्यांचे तुंग येथे दहन



**सांगली :** वर्षानुवर्षे कमी ऊसदर देऊन साखर कारखानदारांकडून शेतकऱ्यांची खुलेआम लूट आणि फसवणूक केली जात असल्याच्या निषेधार्थ तुंग येथे आज ऊसउत्पादक शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे एकत्र येत साखरसम्राटांच्या प्रतिकात्मक पुतळ्यांचे दहन केले.

याबाबत या शेतकऱ्यांनी स्पष्ट केले की, गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी संघटना उसाला रास्त उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळावा, यासाठी संघर्ष करत आहे, पण आज देखील कारखानदारांकडून उसाला कमी दर देण्याची परंपरा कायम ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. उसाला ४६० रुपयांचा दर मिळावा यासाठी शेतकरी संघटनेने आंदोलन केले, तो दर मिळवून देखील दिला. आता तर तो दर २१०० रुपयांच्या घरात पोहोचला आहे. याच दरम्यान आंदोलन फोडण्यासाठी साखर कारखानदारांनी अनेक कार्यकर्त्यांना पैशाचे, पदाचे आमिष दाखवून फोडण्याचा प्रयत्न केला, तरीदेखील ऊसदर आंदोलनाची धग कायम राहिली आहे.

आजदेखील ऊसउत्पादकाला विविध मार्गांनी लुटण्याचा साखर कारखानदारांचा प्रकार सुरूच आहे. याचा निषेध म्हणून या सत्ताधारी राज्यकर्त्यांच्या तसेच साखर कारखानदारांच्या पुतळ्याचे दहन केले आहे. यावेळी तुंग तसेच भागातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकरी संघटना हिंगणघाट विभागीय कापूस परिषद वृत्तांत




**हिंगणघाट** : शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेला सरकारचे तकलादू धोरणच जबाबदार आहे. परिणामी 'याची देही याची डोळा' याप्रमाणे भारतातील शेतकरी कर्जमुक्त झाल्याशिवाय गप्प बसणार नाही, ते आपल्या जीवनातील शेवटचे स्वप्न असल्याचे प्रतिपादन मा. शरद जोशी यांनी केले.

येथील गोकुलधाम मैदानावर कापूस, धान उत्पादक परिषदेत ते बोलत होते. दुपारी १ वाजता परिषदेला प्रारंभ झाला. सुरुवातीला शेतकरी आंदोलनात शहीद झालेल्या ६ शेतकरी बांधवांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर दीपप्रज्वलन केल्यानंतर महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, महात्मा फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर स्वागताध्यक्ष मधुसुदन हरणे, ॲड. वामनराव चटप, रवि देवांग, सरोज काशीकर, शैलजा देशपांडे, ॲड. दिनेश शर्मा, स्वतंत्र विदर्भ राज्याचे समर्थक राजकुमार तिरपुडे, प्रा. मधुकर झोटींग, श्रीचंद कोचर, सुहासिनी वानखेडे व विविध जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष उपस्थित होते. पुढे बोलताना मा. शरद जोशी यांनी शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणांवर कडाडून हल्ला चढवत केंद्र सरकारने तेजीच्या काळात निर्यातबंदी करून ६ हजार ५०० रुपये कापसाचे भाव २५०० रुपयांपर्यंत पाडले. परिणामी कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे २० हजार कोटी शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे बुडाले. या बाबींची चिड आजही मनात ठेवून पुढील आंदोलनाची दिशा शेतकऱ्यांनी ठरविण्याचे आवाहन त्यांनी केले. संघटनेची ताकद कमी झाली म्हणून मी आंदोलनाला घाबरतो, असा चुकीचा अर्थ कुणीही काढू नये. शांतपणे डोक्यावर थंड पाण्याचा पट्ट्या ठेवून आंदोलनाबाबत निर्णय घ्यावयाचा असून प्रत्येकवेळी घोषणा करीत असताना त्या ६ शहीद शेतकऱ्यांचे स्मरण होते, याचीही आठवण त्यांनी करून दिली. यावेळी माजी खासदार वामनराव चटप व सरोज काशीकर, अध्यक्ष रवी देवांग, शैलजा देशपांडे, राजकुमार तिरपुडे, राम नेवले, ॲड. दिनेश शर्मा, प्रा. मधुकरराव झोटींग, सुहासिनी वानखेडे आदींची उपस्थिती होती. या परिषदेचे प्रास्ताविक स्वागताध्यक्ष मधुसूदन हरणे यांनी केले. यावेळी झालेल्या सगळ्या भाषणांतून नेत्यांनी शरद जोशी यांना शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाच्या विरोधात आंदोलन उभारण्याचे आवाहन केले. मधुकर हरणे यांच्या नेतृत्वाखाली सुमारे एका तासाचे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७ वर रास्ता रोको व रेल्वे रोको आंदोलन हे प्रतिकात्मक स्वरूपात करण्यात येईल, अशी घोषणा शरद जोशी यांनी केली. या परिषदेला जवळजवळ चार हजार शेतकऱ्यांची उपस्थिती होती. सुरुवातीला दत्ता राऊत व गुलाबराव राठोड यांनी शेतकरी गीतांचा कार्यक्रम सादर केला. संचालन गंगाधर मुटे यांनी केले. परिषदेच्या शेवटी शैलजा देशपांडे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना शेतकरी संघटनेची शपथ दिली. परिषदेनंतर मैदानावरूनच मधुसूदन हरणे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी रास्ता रोको व रेल्वे रोकोसाठी प्रस्थान केले.